नाटक-३८ मोहना

# प्रस्तावना.

हें नाटक कैलासवासी रा. रा. वामन कृष्ण देशमुख यांनीं रचून माजी "ज्ञानसंग्रहां" तून प्रसिद्ध केलें. मूळांत त्या मासिकपुस्तकाच्या कर्त्यांनीं बरेच फेरफार केले, त्यांप्रमाणेंच प्रकृत नाटक छापून प्रसिद्ध केलें आहे. या नाटकाला आधार लॉर्ड लिटन (माजी गव्हरनर जनरल यांचे तीर्थरूप) यांच्या "Lady of Lyons or Love and Pride" या नाटकाचा घेतला आहे. मूळांत, सन १७८९ त फ्रान्स देशांत जी राज्यक्रान्ति झाली, व जिच्या योगानें लहान मोठे, गरीब श्रीमंत यांमध्यें कांहीं काळपर्यंत भेद राहिला नाहीं, व जिच्या योगानें गरीब व "नीच" मानलेल्या कुळांतील देखील पुरुषांस आपल्या बुद्धीच्या व पराक्रमाच्या जोरावर थोर पदवीस चढतां येऊं लागलें, त्या राज्यक्रांतीच्या कालास उद्देशून ग्रंथ लिहिला आहे. असा काळ महाराष्ट्रदेशांत मराठ्यांच्या उदयाच्या वेळीं होता, व तोच काळ प्रकृत नाटकांत घेतला आहे. देशरिवाज, आचारविचार, व भाषणें यांत ग्रंथकारानें फारसा फरक केला नाहीं. कारण, मूळाची कांहीं तरी प्रतिकृति ही आहे असें वाचकांस वाटावें अशी त्याची इच्छा होती. या ग्रंथांत न्यूनें पुष्कळ आहेत हें ग्रंथकारास आणि ग्रंथप्रकाशकांसही माहीत होतें. परंतु मासिकपुस्तकांतून येणाऱ्या ग्रंथांतून अशीं न्यूनें राहतातच हें सांगणें नको. पूर्वीं जे फेरफार ज्ञानसंग्रहकर्त्यांनीं केले ते ग्रंथकारास पसंत होते, ह्मणून ग्रंथकारास पसंत पडलेला हा ग्रंथ, छापण्याचे दोष वर्ज करून, बहुतेक जसाचा तसाच छापला आहे.

ग्रंथाचे कर्ता

# मोहना.

## अंक १—प्रवेश १.

[करवीर येथें **देवरावाचे** वाड्यांतील महाल. **मोहना** झोपाळ्यावर खोडास टेंकली आहे; तिची दासी **तारा** तिला वारा घालीत आहे; झोपाळ्याजवळ एके चौरंगावर फुलें व कागद पडले आहेत; **आनंदीबाई** जवळच बसली आहे; एके उघडे खिडकींतून बागेची शोभा दिसत आहे.]

**आनंदीबाई**—तारे, तें फूल अंमळ डावीकडे कर पाहूं—[मोहनेचे वेणींतील फूल तारा नीट करिते.] हं, आतां कशी वेणी छान दिसते! अगदीं अवर्णनीय! खरो-खर तूं फारच सुंदर आहेस बेटा! थेट माझी प्रतिमा! तुला लोक इतके भुलतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. या कर-वीरांत तूं एक रत्न आहेस, यामुळें लहान, मोठे, गरीब, श्रीमंत असे सर्व लोक तुला मान देतात. काय चमत्कार आहे! मुलांकडे पाहिलें ह्मणजे आपल्या लहानपणची आठवण होऊन, जणूं काय आपणच पुनःजन्म घेतला आहे असें वाटतें. त्यांचा वर्ण आणि डोळे आपल्यासारखे असले ह्मणजे तर ती केवळ आपली प्रतिमाच आहे असें भासतें.

**मोहना**—[आळसत आळसत] आई, तोंडावर माझी प्रशंसा करून तूं मला चिघडवतेस. [आपल्याशीं] हीं फुलें मला कोणीं पाठविलीं हें समजतें तर बरें होतें.

**आनंदीबाई**—छे, बेटा! मी जी तुझी स्तुति करितें ती तुझी खरी योग्यता तुला समजावी इतक्याच करितां

करितें. तुझ्या नशीचीं मोठ्या कुळांतलाच नवरा आहे.. सौं दर्याची किंमत करणें आपल्या हातीं आहे. आपण करूं तशी ती लाख रुपयांची किंवा कवडीच्या मोलाची होईल तर, जा गाडी तयार करायाला सांग. [ती जाते.]

मोहना—हीं शानदार फुलें नित्य पाठविणारा कोण बरें असावा? किती तरी मधुर हीं!

[ चाकर येतो. ]

चाकर—बाईसाहेब! दौलतराव आले आहेत.

आनंदीबाई—येऊंदे त्यांना आंत. मोहने, ही पाहा आणखी एक मागणी! खचीत, कांहीं संशय नाहीं! तुला भाळलेल्या पुरुषांचा हिशेब राखायाला आणखी एक कारकून ठेवायाला सांगितलें पाहिजे!

[ दौलतराव येतात. ]

दौलतराव—दोघींही येथें आहां हें माझें भाग्यच समजायाचें!—[ एकीकडे ] अहा! किती मारू दिसते! व्यापाऱ्याच्या मुलीशीं संबंध करायासाठीं मी आपल्या कुळाला केवढा कमीपणा आणतों आहें! हे माझा उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहींत!—[ मोठ्यानें ] बाई, आपल्या मुलीशीं थोडेंसें बोलूं का? [ मोहनेजवळ जातो—ती तिरस्कारून उठते.] सुंदरी! या दासाच्या मनांतली इच्छा पूर्ण करशील या आशेनें हा आला आहे. ती कोणती हें तुला केव्हांच समजलें असेल. कालच्या समारंभांत या शहरांतील सर्व सुंदर स्त्रिया जमल्या होत्या, तेव्हां तुझ्या प्रकाशानें त्यांचें तेज लोपून गेलें. त्या वेळेपासून मी तुझा अगदीं दास झालों आहें! तुला ठाऊकच आहे कीं, या सर्व प्रांतांत संपत्तीनें माझी बरोबरी करणारा

कोणी नाहीं. हेंही माहीतच आहे कीं, दिवाणाशीं वांकडें पडल्यामुळें माझें नांव परवांच्या पटांत घातलें नाहीं. नाहीं तर माझी आज सरदारांत गणना झाली असती. आतां माझे ह्मणण्यास तुझा रुकार आहेना? मी आपलें सर्व तन, मन, आणि धन तुला अर्पण करितों.

**मोहना**—[ एकीकडे ] हा जसा कांहीं उपकार करीत आहे अशा थाटानें बोलतो ! [ मोठ्यानें ] ही आपली कृपाच समजायाची ! परंतु मी गरीब आहें, आणि आपल्यासारख्याची बरोबरी करण्याची मुळींच माझ्या अंगीं योग्यता नाहीं, हें मी जाणून आहें; ह्मणून आपण जो मला मोठेपणा देण्याचें मनांत आणिलें आहे त्यास मला रुकार देतां येत नाहीं. आपल्याला वाईट वाटूं नये. [ दुसरीकडे निघून जाते. ]

**दौलतराव**—रुकार नाहीं ! छे ! असें कधीं व्हायाचें नाहीं? तूं उगीच माझें मन पाहतेस !—[आनंदीबाईकडे पाहून] बाई, आपण तरी माझी विनंती ऐकावी. आपल्या कन्येशीं लग्न करण्याची माझी इच्छा आहे, हें कळविण्याकरितां मी आलों आहें. तिचें रूप आणि माझी श्रीमंती यांच्या मानानें तिच्या आंगावर दागीने पडतील. मी देवरावजींची भेट घेऊं का?

**आनंदीबाई**—आपली ही आह्मांवर कृपाच आहे,—पण ते असल्या गोष्टींत मन घालीत नाहींत. आपलें जर परवां सरदारांच्या पटांत नांव घातलें असतें, किंवा माझी मुलगी एखाद्या साधारण मनुष्यास द्यावयाची असती, तर कदाचित् आह्मीं आपणांस रुकार दिला असता.

**दौलतराव**—सरदार व आमच्यासारखे श्रीमंत यांच्यामध्यें लोक फारसा भेद मानीत नाहींत.

आनंदीबाई--तूर्त मानीत नाहींत हें खरें. हा सरदारांचा पट नवीनच झाला आहे, म्हणून लोकांस अजून भेद समजत नाहीं. परंतु पुढें सरदारांचीच मोठ्या लोकांत गणना होईल. आपली योग्यता आह्मी जाणून आहों, आणि आपल्या मोठेपणाला योग्य अशी एखादी स्त्री आपणास मिळेल यांत संशय नाहीं. दौलतराव, शरीर संबंधाची जरी आमची इच्छा नाहीं, तरी ओळखीच्या नात्यानें आपली भेट कधीं कधीं झाली तर आह्मांस आनंद होईल. मोहने, आतां गाडी लवकरच येईल.

दौलतराव—पुरे आतां! समजलों! [ एकीकडे ] नाहीं ह्मटलें! आणि तें उदम्याच्या पोरीनें! सूर्य अस्तास जाण्याच्या पूर्वीच हें आतां सर्व शहरभर होईल. आतां मी बागेंतल्या बंगल्यांत एकांतीं जाऊन बसतों, आणि विरक्त होऊन स्त्रियांचें पुनः तोंड पाहणार नाहीं अशी शपथ वाहून घेतों. नाहीं ह्मणतात अं! त्यांना खचीत वेड लागलें आहे!—बरें तर, येतों मी आतां. [ जातो. ]

आनंदीबाई-- किती दांडगे हे पुरुष असतात बाई! मला वाटतें, बेटा, आपण आपलें वजन चांगलें राखलें. मुलगी कितीही गैरमाहीत असली, तरी तिला लग्नाला रुकार कसा द्यावा हें शिकवावें लागत नाहीं; पण नीट रीतीनें नाहीं ह्मणायाला फार चातुर्य लागतें. नाहीं ह्मणायाचें तें अशा रीतीनें ह्मटलें पाहिजे कीं, आपला मान तर राहावा, गोड तर बोलावें, आणि त्यांत त्या पुरुषाची फजीती तर व्हावी. हें मी चांगलें शिकलें होतें.

[ गंभीरराव येतात. ]

गंभीरराव—ताई, काय चाललें आहे? कां मोहने,

काल रात्रीं अरातीबरोबर फिरून तूं अगदीं दमली होतीस; आ... तरी आहेसना ? तुला पाहून सर्व लोक भुलून गेले. जानरावाला तर तूं काल तेथून निघाल्यापासून अगदीं तळमळ लागली होती; आणि तो अगदीं भ्रमिष्टासारखा झाला होता. पण तें कदाचित् जेवणामुळें असेल.

**मोहना**—कोण, जानराव ! हं !

**आनंदीबाई**—जानराव ? त्याचें नांव माझ्या मुलीच्या मनांत तरी येईल का !

**गंभीरराव**—हं हं ! ! कां नाहीं ? त्याच्या बापानें पुष्कळ संपत्ति मिळवून ठेविली आहे, आणि ताई, तुमच्यापेक्षां त्याचें घराणेंही मोठें आहे. पण तुमच्या मनांत कदाचित् दौलतरावाची घमेंडी असेल. तो मोठा श्रीमंत आहे.

**मोहना**—दौलतराव ! ! मामा, मला उगीच चिडविण्यांत जशी कांहीं तुह्माला गम्मतच वाटते !

**आनंदीबाई**—मोहने, त्याचें काय तूं मनावर घेतेस? भाऊ, असल्या गोष्टींत तुला अगदीं गम्य नाहीं. तुझे सर्व विचार दांडगेपणाचे असतात. दौलतराव माझ्या मोहनेला अगदीं शोभत नाहीं हें तर त्याला केव्हांच कळलें आहे !

**गंभीरराव**—वः ! वः ! जसें कांहीं तुह्मी आपली मुलगी राजघराण्यांतच देण्याचा बेत केला आहे !

**आनंदीबाई**—बरें, आहे. मग काय ह्मणतां ? कित्येक राजपुत्र—

**गंभीरराव**—[ तिला पुरतें न बोलूं देतां ] राजपुत्र ! चल चल ! या वयांत असली बडबड करायाला तुला कांहीं शरम वाटत नाहीं का ?

आनंदी०—या वयांत ! हे शब्द नायकांस, पावणेशत्तर वर्षे पुरीं झालीं ह्मणजे लावितात. आणि तेव्हां देखील ते संन्याशांच्या तोंडांतून निघतात.

[ तारा येते. ]

तारा—बाईसाहेब, गाडी दरवाजापाशीं तयार आहे.

[ जाते. ]

आनंदीबाई—मोहने, चल, आपली शालजोडी अंगावर घे. खरोखर, तूं पोशाकाच्या आणि दुसऱ्या टापटिपीच्या कामांत मोठी कुशल आहेस. [ लडिवाळपणें ] अहाहा ! काय हा डौल ! अगदीं थेट माझ्याप्रमाणें !

मोहना—मामा, आतां आह्मी जातों, बोलल्या चालल्याचा राग येऊं देऊं नका.— [चौरंगाजवळ जाऊन फुलें हातांत घेते.] कोणी बरें हीं फुलें पाठविलीं असावीं ?

[ मोहना आणि आनंदीबाई जातात. ]

गंभीरराव—या पोरीचे डोक्यांत इतकें वेड शिरलें नसतें, तर ही फार उत्तम निघाली असती. आतां ती ताळ्यावर येण्याचा रंग दिसत नाहीं ! वः ! माझें केवढें नशीब कीं माझें लग्न अजून झालें नाहीं ! पतीवर नायकांची निष्ठा फार असते असें लोक ह्मणोत; परंतु वास्तविक पाहिलें असतां स्त्रियांचें स्वतःकडे जितकें लक्ष असतें तितकें दुसऱ्या कोणाकडेही नसतें. [ जातो. ]

---

## प्रवेश २.

[ करवीरापासून दोन कोसावरील एके गावांतील धर्मशाळा. ]

दौलतराव—[ घड्याचे आत ] बरें, तूं घोड्यांस चंदीचरण दे. आह्मी येथें दोन घटका विसावा घेणार.

[ दौलतराव आणि ज्ञानराव प्रवेश करितात. ]

ज्ञानराव—हें काय दौलतराव ! तुमच्या बागेंतील बंगल्यांत मी तुह्मांपाशीं एक दोन दिवस राहीन आणि तुह्मी मला मेजवानी वगैरे कराल, त्यांत यत्किंचितही अडथळा करणार नाहीं, असें कबूल केलें असूनही तुह्मी अगदीं सुतक्यासारखे स्तब्ध दिसतां याला काय ह्मणावें !

दौलतराव—राग नका येऊं देऊं.—आतां काय सांगावें? मी खरोखरी मोठा हतभागी आहें.

ज्ञानराव—तुह्मी ! या शहरांत सर्वांमध्यें मोठे श्रीमंत व चैनी, आणि हतभागी ह्मणतां ?

दौलतराव—खरोखरीच मी तसा आहें.—तुह्मांला ती मोहना माहीत असेलच—त्या देवराव व्यापाऱ्याची एकुलती एक मुलगी ?

ज्ञानराव—माहीत असेल ?—ती कोणाला माहीत नाहीं ? रूपानें तर केवळ रती, आणि गर्वाविषयीं तर सत्यभामेचा अवतार !

दौलतराव—ती गर्विष्ठ तर आहेच, पण तिची आवड फारच वाईट आहे. [ आवेशानें उभा राहून ] मी लग्नाची गोष्ट काढली तेव्हां तिनें चकचकीत मला नाहीं ह्मणून सांगितलें !—मला !

ज्ञानराव—[ एकीकडे ] मलाही तिनें तसेंच सांगितलें ! वः, आतां समाधान झालें ! कोणत्याही प्रकारचे मानसिक दुःखांत दुसऱ्या मनुष्याची तीच अवस्था पाहिली ह्मणजे आपले दुःखाचें सांत्वन होऊन संताप कमी होतो. [ मोठ्यानें ] तुह्मांला नाहीं ह्मटलें ! आणि तें कां बरें ?

दौलतराव—या परवांच्या पटांत माझें नांव घातलें

नाहीं, आणि तिचे मनांतून साधारण मनुष्याबरोबर लग्न करायाचें नाहीं, याखेरीज दुसरें कांहीं कारण मला दिसत नाहीं. आतां आपल्या या प्रांतांत इला मिळणारा सरदार कोणी नाहीं. तिला वाटत असेल, आसपासचे मुलखांतून एखादा राजपुत्र किंवा सरदार येऊन मला मागणी घालील, आणि मग मी त्याला होय ह्मणेन!–काय! मला तिनें नाहीं ह्मटलें आणि माझा अपमान केला अं!–मी हें निमूटपणें कधीं सोसणार नाहीं! या उपमर्दामुळें माझे सर्वांगाचा तिळपापड होऊन गेला आहे–मला आणि तिनें नाकारिलें!

जानराव–दौलतरावजी, अंमळ शांत व्हा. मी तुह्माला एक गुह्य गोष्ट सांगतों.–त्याच कारणाकरितां तिनें मलाही नाकारिलें आहे!

दौलतराव–तुह्माला! अंः! तुमची गोष्ट निराळी! जानराव, आतां तुमचा आमचा करार बरें, आपण तिचा तोरा उतरण्याची कांहीं युक्ति लढवूं; माझ्या मनांत तिचें लग्न एखाद्या बहुरूप्याबरोबर लावून द्यावें असें आहे!

[ विठोबा येतो. ]

विठोबा–दौलतराव साहेब, आपला दास हजर आहे. बागांत जाणें होण्यापूर्वी आपलें भोजन होईलच. कोठींत सर्व पदार्थ तयार आहेत.

दौलतराव–मला भूक नाहीं.

जानराव–मलाही नाहीं. पण रिकाम्या पोटीं फिरणें बरें नाहीं. विठोबा, तुझ्या येथें कोणकोणते पदार्थ तयार आहेत बरें?

[ बाहेरले बाजूस आरोळी होते. ] "शाबास! महाराज शाबास!"

**दौलतराव**— महाराज!—हे कोण महाराज? मला असें वाटत होतें कीं, हल्लीं येथें महाराज नाहींत.

**विठोबा**— हः! हः! पोरें त्याला नेहमीं 'महाराज' ह्मणतात. त्यानें आतांच निशाण मारण्यांत बक्षीस मिळविलें, ह्मणून ते त्याला थाटानें घरीं नेत आहेत.

**दौलतराव**— त्याला! आणि तो ह्मणजे कोण?

**विठोबा**— या खेड्याचें नाक जो यशवंतराव त्याखेरीज दुसरा कोण असणार? त्याचें नांव आपल्या कानीं आलेंच असेल?

**ज्ञानराव**— आजपर्यंत नाहीं तसा योग आला.

**दौलतराव**— हां हां! तो यशवंतराव, त्या ह्मातान्या मालोजी माळ्याचा पोर?

**विठोबा**— तोच—हा पुरुष मोठा चमत्कारिक आहे.

**दौलतराव**— त्यानें काय चमत्कार केला? दुसरे माळ्यांपेक्षां याचीं फुलें चांगलीं असतात काय?

**विठोबा**— तसें नाहीं, त्यानें आतां माळ्याचें काम सोडून दिलें आहे. त्याचे बापानें त्यासाठीं बरेंच द्रव्य मिळवून ठेविलें आहे. तो मोठा हरहुनरी आहे.

**ज्ञानराव**— मोठा काय?—

**विठोबा**— हरहुनरी. ह्मणजे ज्या मनुष्याला सर्व गोष्टी करितां येत असून उपयोगाची तेवढी मात्र करितां येत नाहीं, त्याला हरहुनरी ह्मणतात.

**दौलतराव**— तूं माझी उत्कंठा अधिकच करितोस.—बरें पुढें?

**विठोबा**— त्या ह्मातान्या मालोजीस मरून सुमारें चार वर्षें झालीं. त्यानें आपल्या मुलाला खाऊन पिऊन सुखी

राहण्यापुरतें धन मिळवून ठेविलें आहे. मग विचितळें तों यशवंताचे वृत्तींत मोठा पालट पडला. त्यानें पुस्तकें वाचण्याचें मनावर घेतलें. संस्कृताचा अभ्यास चालविण्याकरितां करवीराहून एक शास्त्री बोलाविले. त्या शास्त्रीबोवाच्या डोक्यांत इतकें शहाणपण भरलें होतें कीं, त्यांतलें तें उडून जाऊं नये ह्मणून त्यांना मोठें पागोटें घालावें लागे. पुढें त्यानें एक पट्टा शिकविणारा, एक उत्तम गायन शिकविणारा, व एक तालीम शिकविणारा, असे तीन वस्ताद ठेविले. मग तो चित्रें काढायाला शिकला; आणि सरशेवटीं लोक ह्मणूं लागले कीं, यशवंता पुण्यास जाणार आणि चितान्याचा धंदा सुरू करणार. पोरें तर पहिल्यानें त्याजकडे पाहून हंसत. पण तो नांवाचा यशवंता,—मोठा दांडगा व शूर; त्यानें लवकरच आपल्याला हांसल्याबद्दल त्या पोरांची खोड मोडली. तो सिंहाप्रमाणें शूर आहे. आतां त्याचीं कृत्यें पाहून, पूर्वी जीं पोरें त्याची थट्टा करीत असत, तींच त्याच्या तर्फेचीं झालीं व लोकांची फजीती करूं लागलीं.

**दौलतराव**—खरोखर, पोर मोठा होतकरू दिसतो! पण त्याला महाराज कां ह्मणून ह्मणतात?

**विठोबा**—एक तर, तो त्या सर्वांत पुढारी आहे ह्मणून; आणि दुसरें, तो इतका डौलानें राहतो आणि इतका चांगला पोशाक करितो कीं, तो अगदीं राजपुत्रासारखा दिसतो.

**दौलतराव**—पण त्याचे डोक्यांत हें वेड कोठून शिरलें बरें? त्याचे मनांत मोठी आशा असेल?

**विठोबा**—होय, आशा तर खरीच; ज्या आशेमुळें मोठमोठाले लोक वेडे होऊन गेले आहेत ती,—सुंदर स्त्री प्राप्त होण्याची आशा.

**दौलतराव**–शाबास ! पण या मदनाच्या पुतळ्यास कोणती स्त्री पाहिजे आहे ?

**विठोबा**– हं, ती–पण गृहस्थहो ! ती गोष्ट गुह्य आहे, बाहेर फुटतां कामा नये.

**दौलतराव**–हो खरोखर ! नाहीं फुटायाची !

**विठोबा**– ऐका तर, गरीब बिचारी माउली त्याची आई तिनें मला सांगितलें आहे कीं, सर्व करवीरांतलें रत्न जी देवरावाची मोहना, तिच्यावर त्याचें मन बसलें आहे.

**दौलतराव आणि जानराव**–हः ! हः ! हः ! खूब ! खूब !!

**विठोबा**–तुह्मी हांसा, पण यांत अगदीं खोटें नाहीं.

**दौलतराव**– बरें पण, याजविषयीं त्या सुंदरीचें मत कसें आहे ?

**विठोबा**– महाराज, हा लहानपणीं तिचे बापाचे बागेंत काम करीत असे, तरी तिनें याजकडे फुकटचें एकदां ढुंकूनही पाहिलें नाहीं.

**दौलतराव**–हें तरी खचीत का पण ?

**विठोबा**– त्याची आईच सांगते कीं, मोहनेनें त्याला काळा कां गोरा तो कधींही पाहिला नाहीं.

**दौलतराव**– [ जानरावास एकीकडे नेऊन ] भली खाशी युक्ति सांपडली ! वः ! काय नामी युक्ति ! आतां सूड घेतलाच ह्मणा. त्या दांडग्या पोरीला हा शानदार राजपुत्र सांपडला !–तुमच्या ध्यानांत आलें का ?

**जानराव**– छे, नाहीं आलें !

**दौलतराव**– अहो, ती गोष्ट अगदीं उघड आहे. किती मूर्ख आहां हो ! जर आपण या छानछोक माळ्याच्या पोराला राजपुत्र बनविलें, आणि याकरितां त्याला पैसा, क-

पडे, आणि इतमामाकरितां चाकर ठेवून दिले; आणि मोहनेशीं मागणी घालवून तिचें याचें लग्न लावून दिलें, तर काय शान मौज होईल ?

जानराव– हो हो ! फार उत्तम मसलत ही ! पण या महाराजांस जो खर्च लागेल तो पुरविण्याची काय युक्ति ?

दौलतराव– अंः, त्यांत काय आहे ? मनाप्रमाणें सूड घेण्याला हजार पांचशें रुपये कांहीं अधिक नाहींत! आतां सर्व यथास्थित व्हावें ह्मणून, माझा जो परम विश्वासू हुजऱ्या आहे, त्याला मी महाराजांच्या दिमतीस देईन, ह्मणजे तो सर्व चाकर वगैरे नेमण्याची तजवीज करील. चला आपण आतां त्याजकडे एकदां जाऊं, आणि ती खरोखरीच अशी विलक्षण मूर्ति आहे कीं काय तें पाहूं.

जानराव–ठीक आहे; पण आपणाला जेवायाचें नाहीं का?

दौलतराव– तुमचें नेहमीं लक्ष जेवणाकडे! बरें, विठोबा, त्या यशवंताचें झोंपडें येथून किती दूर आहे बरें? असलें रत्न एकदां पाहावें अशी माझी इच्छा आहे.

विठोबा– याच गल्लीनें असे खालीं जा, आणि नंतर एक मैदान लागेल तें वलांडून पलीकडे गेलें ह्मणजे त्याच्या आईचें झोंपडें आपल्या दृष्टीस पडेल.

दौलतराव– हो खरेंच, घरीं त्याची आई आहे. [ एकीकडे ] त्या ह्मातारीचा विश्वास धरून उपयोगी नाहीं. त्याला एथेंच बोलावून आणावें हें बरें. जानराव, आंत या, मी एक त्याला चिटी लिहितों.

जानराव– वाः, दौलतराव, जानराव, आणि मंडळी,– धंदा–नवीन राजे बनविण्याचा !! वः, काय उत्तम धंदा हा !! बरें पण तुह्मी इतके गंभीर कां ?

दौलतराव–तुह्माला आपली फक्त गम्मत आठवते,–पण मला सूड घेणें आहे. [धर्मशाळेंत जातात.]

---

## प्रवेश ३.

[यशवंताचे घराची आंतली बाजू; ठिकठिकाणीं फुलें लावून ठेविलीं आहेत; एके खुंटीस सतार टांगलेली आहे. चौरंगावर दऊत, रुमाल, व कांहीं कागद पडले आहेत; समोरले भिंतीस एक तसबीर टांगलेली असून तिजवर पडदा टाकलेला आहे; एकीकडे तरवार व दुसरीं हत्यारें पडलीं आहेत; सर्व सामान व्यवस्थितपणें लावलेलें आहे; उजवे हातास माडीवर जाण्यास एक जिना आहे.]

[बाहेर आरोळी होते] "शाबास यशवंतराव! शाबास महाराज, शाबास!"

**जिजाबाई**–ऐका!–हा माझा मुलगा! हा खच्चीत आज इनाम मिळवून आला आहे. आणि आतां तो आपले सोबत्यांस मेजवानी देईल.

**यशवंत०**–[पडद्यांत] काय! मित्रहो, तुह्मी आंत येत नाहींना! बरें बरें,–हें घ्या, आणि वाटेल तेथें मौज करा. रामराम, तुह्मां सर्वांना रामराम!

[आरोळी]–"यशवंतराव महाराजांचा जयजयकार असो!"

[यशवंतराव आपली बंदूक घेऊन प्रवेश करतो.]

**यशवंतराव**–आई, मला शाबासकी दे! मीं बक्षीस मिळविलें! एकही निशाण चुकलों नाहीं! ही बंदूक किती बरें चांगली आहे!

**जिजाबाई**–हं:! तिची काय बरें किंमत आहे यशवंता?

**यशवंत०**–किंमत! जेवढी द्यावी तेवढी आहे! शिपायाला तिची किंमत काय असते! कीर्ति अमूल्य आहे.

जिजाबाई—कीर्तीचें नांव थोर लोकांनीं घ्यावें यशवंता ! हे वृथा मनोरथ फुकाचे नाहींत बाबा ! त्याप्रमाणें चालण्यास फार खर्च लागतो. याचा परिणाम काय होणार आतां !—संस्कृत पोथ्या वाचणें, गाणें, सतार वाजविणें, दांडपट्टा आणि कुस्त्या खेळणें, चित्रें काढणें—या सर्वांपासून तुला काय नफा आहे ? तीं सर्व चांगलीं दिसतात खरीं, पण त्यांपासून प्राप्ति काय होते बरें ?

यशवंत०—द्रव्य! संपत्ति मिळते आई ! चित्तास समाधान वाटतें—अंतःकरण प्रफुल्लित होतें—मोठमोठाले विचार सुचतात—कीर्तीची उमेद येते—आणि मोहनेबरोबर लग्न करण्यास योग्य व्हावें असें वाटतें.—असे अनेक फायदे होतात.

जिजाबाई—वेडें पोर ! त्या तरुणीच्या स्वप्नांतही तूं येणार नाहींस.

यशवंत०—काय! तारे आणि नक्षत्रें आपणाविषयीं कधीं विचार करतात काय ? पण जर एखादा अंधारकोठडींत ठेवलेला बंदीवान त्याचा प्रकाश आपल्या कोठडींत पाहील, तर तूं त्यांस—पाहूं नको—ह्मणून सांगशील काय ? त्याचप्रमाणें मी आतां या झोंपड्यांत बसलेला दरिद्री असतां मोहनेविषयीं विचार करितों, आणि या स्थितीस क्षणभर विसरतों. [ तसबिरीजवळ जाऊन पडदा एकीकडे करितो ] ही पाहा तिची तसबीर, मी ही फक्त स्मरणावरून काढिली आहे. अरेरे ! हें माझें चित्र तिचे रूपांत कमीपणा आणितें!— [ कुंचा हातांत घेतो आणि एकीकडे फेंकतो ]—मी चितारी कधींही होणार नाहीं. एका तसबिरीशिवाय मला कांहीं काढतां येत नाहीं, आणि ती काढणें तर फारच कठिण आहे. मी आतां शिपाई बनेन—आपल्या देशांत शिपायांची गरज

आहे ! पण ज्या गांवांत मोहना आहे तो गांव सोडून जावें कसें ! किती वाजले असतील बरें ?–इतका उशीर झाला का ? अाई, आतां मी तुला आपली एक गुह्य गोष्ट सांगतों. तुला माहीतच आहे कीं, मी आज महिनाभर मोहनेला उत्तम उत्तम फुलें पाठवीत असतों. तीं फुलें ती नित्य डोकींत घालीत असते, आणि तेणेंकरून शहरांत सुवासाचा घमघमाट सुटतो. त्यामुळें मी आतां अधिक धीट झालों आहें. तिजविषयीं जी माझी भक्ति आहे, ती मी कवितारूपानें प्रदर्शित केली आहे; आणि त्याखालीं मीं आपलें नांव लिहून, तिजकडे पाठविली आहे. कविता घेऊन गेलेला मनुष्य आतां इतक्यांत येईल. मी त्यास, उत्तराकरितां थोडा थांब, ह्मणून सांगितलें आहे.

जिजाबाई–यशवंता, आणि ती तुला काय बरें उत्तर पाठवील ?

यशवंत०–काय ह्मणजे ?–रुक्मिणीनें कृष्णास पाठविलें तें ! माझी ती भेट घेईल. मग तिचें भाषण माझ्या कानीं पडेल. तिची माझी दृष्टादृष्टी होईल. पुढील सुखाचे विचार जे तिच्या मनांत येतील ते मी तिच्या लज्जायुक्त मुद्रेवरून ओळखीन. ह्मणजे मग–मग–मग तर काय–मी माळ्याचा मुलगा हें ती विसरून जाईल.

जिजाबाई–होय सगळें खरें, पण तुझें बोलणें ती ऐकेल तर पुढल्या या सगळ्या गोष्टी !!

यशवंत०–पुढें काय होणार हें मला सगळें समजलें. ती ह्मणेल कीं, अंगीं गुण असणें हेंच काय तें मोठेपण आहे. ती आपल्या हातांनीं गुंफलेला फुलांचा गजरा मला घालावयास देईल. मग ती काय मौज विचारतां ! मी से-

त्यांत जाऊन मिळेन. मी आपलें नांव गाजवीन आणि मोठ्या योग्यतेस चढेन. मग अतिरूपवती स्त्री देखील माझें नांव घेण्यास लाजणार नाहीं. मी तेथून परत आल्यावर तिला हक्कानें ह्मणेन—"प्रीति अभिमानी मनुष्याच्या गर्वाचें हरण करीत नाहीं, ती गरिबास मोठ्या योग्यतेस चढविते." वाहवा! काय हे माझे विचार! ते माझ्या अंतःकरणांत मावत नाहींत! तारुण्याच्या आणि उमेदीच्या जोरानें काय काय पुढले विचार मनांत येतात तरी हे!

[ दार वाजतें. ]

जिजाबाई—कोण आहे?—ये आंत.

[ ग्यानू आंत येतो. ]

यशवंत०—रामराम, ग्यानबा, रामराम. पत्र कोठें आहे?—कां तिकडे कां तोंड फिरवितोस? पत्र काय केलें? [ ग्यानू एक पत्र देतो ] हें! अरे हें तर मी तुला दिलें होतें तेंच! हें तू दिलें नाहीं का?

ग्यानू—होय, मी तें दिलें.

यशवंत०—माझ्या कविताच मला परत आल्या आणि दुसरें कांहीं नाहीं!

ग्यानू—आपलें पत्र घेऊन जाणाराचा मान कितपत झाला तो ऐकाल तर आपणास मोठें भूषण वाटेल. यशवंतराव, तें सर्व मीं तुह्माकरितां ह्मणून सोसलें; दुसरा मराठा कधींहीं अशी बेअब्रू सहन करिता ना!

यशवंत०—बेअब्रू! काय ग्यानबा, बेअब्रू झाली?

ग्यानू—मीं तें आपलें पत्र देवडीवरील एका मनुष्याचे हातीं दिलें, मग तें या हातचें त्या हातीं असें होत होत शेवटीं ज्या बाईसाहेबांचे नांवचें होतें त्यांचे हातीं गेलें.

**यशवंत**०–तिला पोंहोचलें, हें तरीं खरें का पण? तिच्या हातीं गेलें–बरें पुढें?

**ग्यानू**–तिला तें पोंहोचलें, आणि माझ्या हातीं तें सव्याज गुद्द्यांनिशीं परत आलें! ऐकतां का यशवंतराव?–गुद्द्यांनिशीं बरें! आह्मी माळी कोणाचे गुलाम आहोंत कीं काय, ह्मणून त्यांनीं आह्मांस असें मारावें?

**यशवंत**०–गुद्द्यांनिशीं? नाहीं ग्यानबा, गुद्दे नसतील रे!

**ग्यानू**–मी तुह्माला वण देखील दाखवीन! पण असे गुद्दे खाणें ही लाजेची गोष्ट आहे. ते दाखविण्यांत काय आहे? ज्या खिजमतगारानें तुमचें पत्र चिखलांत फेंकून दिलें, त्यानें शपथ वाहून सांगितलें कीं, मोहनेचा आणि तिचे आईचा असा अपमान कोणीं कधीं केला नव्हता. यशवंतराव, असा आपल्या पत्रांत मजकूर तरी काय होता?

**यशवंत**०–[ पत्राकडे पाहून ] एखाद्या गुलामानें देखील असा मजकूर सार्वभौम राणीस लिहिला तर त्यास कोणी दोष देणार नाहीं!–यांत एक अक्षरही अयोग्य नाहीं.

**ग्यानू**–त्यांनीं आणखी तोंडजबानी सांगितलें आहे कीं, जर आपली स्वारी त्या रस्त्यानें जाईल तर आपणासही मजप्रमाणेंच मान मिळेल. काय यशवंतराव, हें आपण सहन करावें बरें?

**यशवंत**०–[ ग्यानूचा हात ओढून ] मला क्षमा कर. हा सर्व माझा अपराध आहे. तुला असें होण्याला मीच कारण झालों. मी हें कधीं विसरणार नाहीं, पुरा सूड घेईन! कायहो निर्दयपणा! किती हा उद्धटपणा!

**ग्यानू**–आपणाला फार राग आला आहे; मजविषयीं कांहीं एक आपण मनांत आणूं नका. मी आपणाकरितां

विहिरींत किंवा आगींतही उडी टाकीन. पशु गुद्दे! अंग दुखल्याचें कांहीं नाहीं, पण यशवंतराव, शरम—

यशवंत०—सांगा काय निरोप सांगितला तो. त्यांचा अपमान कसा झाला? कशासाठीं पण? असा कोणता अपराध घडला?

ग्यानू—त्या एवढ्या मोठ्या व्यापाऱ्याचे कन्येला—त्या मोहनेला—तुम्ही पत्र नाहीं का लिहिलें?

यशवंत०—बरें मग?—

ग्यानू—तुम्ही हलके,—माळ्याचे पुत्र नव्हे का?—हाच त्यांस राग आला. विसरा ती गोष्ट आतां—पण त्या मराठ्यानें गुद्दे खावे अं!!

जिजाबाई—यशवंता, आतां बरी तुझी खोड मोडली.

यशवंत०—[ पत्र फाडतो ] ही पहा मी तिच्या प्रतिमेची अशी दुर्दशा करितों! भररस्त्यांत तिला उभी करीन,—तिचा अपमान करीन,—तिच्या हलकट चाकरास ठोक देईन,—हें मी एकदां करीनच करीन!—[ एकदम आईकडे वळून ] आई, मला कांहीं कुबड आहे?—मी कांहीं कुरूप आहें?—का अक्राळविक्राळ दिसतों?

जिजाबाई—कोण तूं!

यशवंत०—कां मित्रा?—कां चोर?—कां लबाड?

जिजाबाई—तूं!

यशवंत०—काय मी मतिमंद आहें?—का उगाच कुशाऱ्क्या मारणारा आहें?—का मी वेडा आहें?

जिजाबाई—नाहीं नाहीं, तसें नाहीं!

यशवंत—तर मग आहें तरी कसा?—या सर्वांहून वाईट? हां, मी माळी आहें! प्रीतीशीं आणि माळीपणाशीं काय संबंध आहे?

ईश्वरा ! आह्मा सर्व गरीब लोकांना—आह्मां लांकडें तोडणारांस आणि पाणी ओढणारांस—या जगांतून नाहींसें कर, ह्मणजे आह्मावांचून कसें चालतें तें या श्रीमंत लोकांस कळेल !

[ धर्मशाळेंतील एक चाकर येतो. ]

**चाकर**—यशवंतरावांच्या नांवचें एक पत्र आणलें आहे.

**यशवंत०**—काय, पत्र ! तिजकडून आलें असेल कदाचित्—कोणीं पाठविलेंरे तुला ?

**चाकर**—रावसाहेबांनीं, दौलतराव रावसाहेबांनीं. ते आपल्या बागेंत जात असतां विश्रांति घेण्याकरितां आमच्या धर्मशाळेंत उतरले आहेत.

**यशवंत०**—दौलतराव साहेबानीं !— [ पत्र वाचतो. ]

" यशवंतराव, तुमची गुह्य गोष्ट मला माहीत आहे,—
" तुह्मी आपल्या योग्यतेच्या बाहेर उडी मारायास पाहत
" आहां,—मोठ्या कुलांतील स्त्रीवर तुमचें मन गेलें आहे. जर
" तुह्मांमध्यें शहाणपण, धैर्य, आणि विचारशक्ति हे गुण
" असतील, तर तुमच्या सर्व इच्छा सफल करण्याचें माझ्या
" हातीं आहे. मी याबद्दल तुह्मापाशीं इतकेंच मागतों कीं,
" तुह्मीं आपले कल्याणाचा प्रयत्न मध्येंच सोडूं नये. जिज-
" वर तुह्मी अगदीं फिदा झालां आहां, तिशीं लग्न लावीन,
" अशी शपथ तुह्मीं मजजवळ घेतली पाहिजे. तसेंच तिला
" तुह्मीं लग्नाचे दिवशींच आपले घरीं नेलें पाहिजे. हें काम
" घडवून आणण्याची माझी मनापासून इच्छा आहे. आतां
" तुह्मांला आणखी कांहीं विचारणें असेल तर हें पत्र वाचतां-
" च यांच मनुष्यासमागमें या.

" तुमचा मित्र आणि हितकर्ता—

" दौलतराव. "

यशवंत०—मीं वाचलें हें खरें का ? काय, ह्या माझ्या कामवासनांनीं बीरमंत्र तर नाहींना कांहीं भरला ? ही कांहीं भूतचेष्टा तर नव्हेना ? मी त्याजकडे आतांच जाईन.

जिजाबाई—यशवंता, तें काय आहे ?

यशवंत०—" जिजवर तुह्मी फिदा झालां आहां तिशीं लग्न लावा "—" तिला तुह्मी आपल्या घरीं घेऊन जा—" सूड उगविण्याची इच्छा आणि प्रीति यांतून कोणाचा अंमल अधिक आहे ?— [ तसबिरीकडे पाहून ] काय सुंदर मुख आहे तरी हें! मजकडे पाहून हांसतेस का ? किती मूर्ख मी आहें तरी अजून !—कीं तिजवर प्रीति करितों हा! छेछे, मी एक मनःकल्पित स्त्रीस आजपर्यंत भजत होतों. आतां जशाशीं तसें वागावें हें बरोबर. भाई, मी इतक्यांत जाऊन येतों.[ जीजाबाई जाते. ] मला वेड लागल्यासारखें झालें आहे. [ पुनः पत्र पाहतो. ] " जिजवर तुह्मी फिदा झालां आहां तिशीं लग्न लावा.—" छेः, ही कांहीं थट्टा नव्हे, आणि स्वप्नही नव्हे.　　[ जातो. ]

## अंक पहिला समाप्त.

# अंक २–प्रवेश १.

[ करवीरांतील **देवरावाचे** वाड्याजवळचा बाग. रंगभूमीचे मागल्या बाजूस वाडा दिसत आहे. **दौलतराव** आणि **जानराव** येतात. ]

**दौलतराव**–बरें जानराव, तुह्माला कशी काय माझी युक्ति वाटते ? कां, ती उत्कृष्ट रीतीनें साधली कीं नाहीं? त्या शेखी मिरविणारे आनंदीबाईस व त्या नाक मुरडणारे मोहनेस काश्मीरचे राजपुत्राची ओळख करून दिल्यापासून दुसरें कांहींच सुचत नाहींसें झालें आहे ! त्याला येथें येऊन फार दिवसही झाले नाहींत, तोंच त्यास मोहना देण्याचें त्यांनीं कबूल केलें !

**जानराव**–तुह्मीं ही मोठी शान गोष्ट केली कीं, आपणास कोणीं ओळखूं नये ह्मणून महाराज वेष बदलून फिरत आहेत, असें त्यांस सांगितलें. कारण, इकडील राजवंशांतले पुरुष परकीय राजांचा द्वेष करितात, आणि त्यांस समजलें तर या राजश्रीची ते तेव्हांच उचलबांगडी करतील. यास तर डौलानें वागण्याची फार इच्छा आहे, आणि तो आपले बागांतील फुलझाडांस जसा पाणी घालतो त्याप्रमाणें सढळ हातानें आपलें द्रव्य उधळूं लागला आहे.

**दौलतराव**–खरोखर, तो फारच उधळ्या आहे. मला वाटतें, तो लुच्चा हें मुद्दाम करीत आहे. तें कसेंही असो, पण आपणास इतकें कबूल केलें पाहिजे कीं, त्याची वर्तणूक आपणास भूषणकारक आहे, आणि त्यानें आपला उंची पोशाग केला व ती माझी हिरे जडलेली डबी हातांत घेतली ह्मणजे चांगला शोभतो.

ज्ञानराव—आणि माझी हिऱ्याची आंगठीही चांगली दिसते! पण तो शेवटपर्यंत निश्चयानें वागेल असें तुह्मांस वाटतें काय? मला कांहीं त्याच्या मनांत दया उत्पन्न झाल्याचीं चिन्हें दिसत आहेत; त्याच्या मनाला द्रव येऊन जर का त्यानें आपला खरेपणा बाहेर काढला, ह्मणजे मग त्याला आपल्या मोठेपणाची बतावणी करतां येणार नाहीं.

दौलतराव—पण तो शपथेनें बांधला गेला आहे ना! ही शपथ आतां तो मोडणार नाहीं, कारण असले हलके लोक मोठे देवभोळे असतात. पण त्याला कोणी ओळखील याची मोठी मला धास्ती आहे. पाहा त्या बहादर गंभीररावाला—ह्मणजे, आनंदीबाईच्या चुलतभावाला खचीत याचा कांहीं संशय आला आहे. तर आतां आपणास कशी तरी जलदी करून या सोंगाची बतावणी पुरी केली पाहिजे. मी आजचे आज याचा शेवट करण्याची युक्ति काढिली आहे.

ज्ञानराव-आजच्या आज! गरीब बिचारी मोहना! तिचें हल्लींचें स्वप्नवत् सुख आतां लवकरच नाहींसें होईल.

दौलतराव—होय, आजच त्या उभयतांचें लग्न होईल; आजच्या रात्रींच तो आपल्या शपथेप्रमाणें आपल्या बायकोस धर्मशाळेंत घेऊन जाईल. आणि तेथें पोहोंचल्या-बरोबर हा जामानिमा, डामडौल, चाकरलोक वगैरे एकदम नाहींतसे होतील; मग त्या मोहना राणीसाहेबांचे डोळे उघडतील आणि त्यांस समजून येईल कीं, आपण श्रीमंताचे मुलास नाकारून हा माळ्याचा पोर पदरीं घेतला.—अग मोहने! पूर्वी मी तुजवर इतकी प्रीति करीत होतों, आणि आतां तुझा मी इतका द्वेष करितों, तरी मी अजून तला सोडलें नाहीं. तुझा शेवटपर्यंत पिच्छा पुरवीन.—मग,

मानहानि झाल्यापासून काय दुःख आहे, हें तुला समजेल !

[ काश्मीरचे राजपुत्राप्रमाणें सजलेले यशवंतराव मोहनेचा हात धरून घरांतून येतात. आनंदीबाई वारा घेत येते, व गंभीररावही त्याजबरोबर येतात. दौलतराव आणि ज्ञानराव हे त्यास लवून रामराम करितात. मोहना आणि यशवंतराव एकीकडे चालतात. ]

**आनंदीबाई**— खरोखर, आज बाबांनी माझें हंसून हंसून पोट दुखूं लागलें. हे महाराज तर फारच गमती आहेत. काय त्यांचे बोलण्याची चतुराई सांगूं ! यावरून यांणीं आपलें सर्व आयुष्य दरबारांत घालविलें आहे हें सहज समजतें.

**गंभीरराव**—आनंदीताई—तुला ग काय दरबारची माहिती? तुह्मी बायका आपल्या पुरुषांची पारख बाजारांतील वस्तूंप्रमाणें करितां. गुणावगुण कसेही असोत, तो बाहेरून देखणा असला ह्मणजे बायकांस पसंत पडतो.

**आनंदीबाई**— काय दांडगेपणा हा !—सर्व प्रकारें आपला शिपायी बाणा !—तूं आमच्या घराण्याला शोभत नाहींस. मोहनेचें लग्न झालें ह्मणजे खरोखर तुझें येणें जाणें बंद केलें पाहिजे. माझे जांवई—हे काश्मीरचे राजपुत्र—यांचा अपमान करणारा कसाही माझा नातलग असला तरी मी त्याला आश्रय देणार नाहीं.

**यशवंतराव**—[ पुढें येऊन ] ही बाग फार शानदार दिसते. ही कोणीं बरें लाविली ? [ दौलतराव व ज्ञानराव एकीकडे जातात ].

**आनंदीबाई**—महाराज, ती मालोजी माळ्यानें लाविली आहे. तो फारच प्रामाणिक व आपली योग्यता जाणणारा असे. त्याचा मुलगा यशवंता याविषयीं मला तसें ह्मणतां येत नाहीं. कारण तो मोठा गर्विष्ठ व छचोर आहे. त्यानें परवां

[ हंसते ] कांहीं वेड्या वांकड्या कविता—किती हो मूर्ख !—करून माझ्या मोहनेकडे पाठविल्या होत्या !

मोहना—खरोखर त्या पाहून आपणाला हासूं आलें असतें! आपली कविता किती चांगली असते !

यशवंतराव—हा यशवंता अतिशय दांडगा असला पाहिजे.

गंभीरराव—पण तो देखणा आहे काय ?

आनंदीबाई—मी असल्या मुरदाडाकडे कधीं लक्ष देत नसतें.—असेल मेला असला तर वेडाना विद्रा ! किती झाला तरी तो हलकट नांगऱ्याच !

गंभीरराव—पण आपला देवडीवाला काल ह्मणत होता कीं, तो हुबेहूब या महाराजांसारखा आहे.

यशवंतराव—[ तपकीर ओढीत ] व: ! काय शान् कोटी !

आनंदीबाई—गंभीरराव, तुला असें बोलायाला लाज कशी नाहीं वाटली ? काय तो या महाराजांसारखा !

मोहना—काय ! तुमचे सारखा ! आई, काय महाराजांसारखा आहे ह्मणून ह्मणतात ? मामा, मी आजपासून तुमच्याशीं बोलणार नाहीं.

यशवंतराव—[एकीकडे] व: ! पदवीच्या योगानें सौंदर्य येतें एकून ! जेव्हां मी माळ्याचा पोर होतों तेव्हां मला कोणी सुंदर ह्मटलें नाहीं; आणि आतां मी राजपुत्र आहें ह्मणून जर इतका सुंदर आहें, तर बादशहा झाल्यावर मला काय ह्मणतील ! [मोठ्यानें] दौलतरावजी, घ्या. [तपकीरीची डबी पुढें करितो.]

दौलतराव—महाराज, क्षमा असावी. मला असलीं व्यसनें नाहींत.

यशवंतराव—दौलतराव, याची जर व्यसनांत गणना असती तर तें आपणास असतेंच, यांत संशय नाहीं.

आनंदीबाई— हा ! हा ! हा ! कशी फजीती झाली ! काय चातुर्य तरी हें !

दौलतराव— [ रागावून एकीकडे ] काय लुच्चा आहे हा !

आनंदीबाई— काय नकशीदार डबी आहे तरी ही !

मोहना— आणि ती आंगठी काय कमी आहे !

यशवंतराव— आपले मनांत भरली वाटतें डबी—त्यांत काय आहे ! ती दिल्लीच्या बादशाहानें माझ्या पणजास बक्षीस दिली होती, ह्मणून जवळ असावीशी वाटते. पण ती आपण घ्या. [ डबी पुढें करितो. ]

दौलतराव— [ त्याचा पदर धरून ] हें काय ! वेड तर नाहीं ना लागलें ? ती माझी डबी, आणि तुह्मी देतां कशी ? तिला पांचशें रुपये पडले आहेत.

यशवंतराव— [ तिकडे लक्ष न देतां मोहनेकडे वळून ] आणि तुला ही आंगठी पाहिजे वाटतें ? अहाहा ! खरोखर, तुझे नेत्रांचे तेजामुळें ही अधिकच झळकूं लागली आहे. ( तिच्या बोटांत आंगठी घालतो ) आतां तर माझें अंतःकरणच तुझे हातांत आलें, आणि तें चिरकाळ असेंच असो.

जानराव— [ त्याला थोडा ओढून ] थांबा, थांबा,—हें काय आपण आरंभिलें ! ! ती आंगठी माझे मावशीनें दिलेली आहे. तिचें पाणी पहिल्या प्रतीचें आहे. महाराज, असल्या लुच्चेगिरीचें प्रायश्चित्त आपणास भोगावें लागेल.

यशवंतराव— [ न ऐकल्यासारखें करून ] या आंगठीची गोष्ट चमत्कारिक आहे. ही माझे आज्याला लग्नाचे वेळीं मिळालेली आहे. [ आनंदीबाई आणि मोहना आंगठी पाहतात. दौलतराव व जानराव यांजकडे वळून ] छे, काय हें ! राजांनीं असेंच उदार असलें पाहिजे.

(गंभीरराव फार बारकाईनें पाहत होता त्याजकडे फिरून) हे माझे प्रिय स्नेही माझे हिताची इतकी काळजी बाळगितात कीं, तें आपल्या घरच्याप्रमाणें माझ्या वस्तूंला जपतात !

दौलतराव आणि जानराव–(गोंधळलेसें करून) वः! फार चांगली थट्टा ही ! (एकीकडे बोलून यशवंतरावास आपलें मनोगत सुचवितात).

गंभीरराव–ही कसची कुजबूज चालली आहे ? खचीत यांत कांहीं तरी ठकविद्या आहे. हे काश्मीरचे राजपुत्र असतील तर नांव बदलून टाकीन ! आतां पाहतों यांची परीक्षा. बिस्यार घरीब बंदे हुजूर.[1]

यशवंतराव–ह्मणजे काय बरें ?

गंभीरराव–अजदीद नशुवा बिस्यार खुशबूद हस्तम् फिशुमा बखैर आफी यत् हस्तेद्.[2]

यशवंतराव–हुं: हुं:.

गंभीरराव–चे खुश मोसीम अस्त. चे खबर अस्ते ?[3]

यशवंतराव–कां राव, ही कसची बडबड लाविली आहे ?

गंभीरराव–हो हो!–फक्त फारशी महाराज!–काश्मीरचे राजेसाहेबांस फारशी भाषा समजत नाहीं !

यशवंतराव–आपण बोलतां ही समजत नाहीं. आणि समजेल तरी कोणाला?

आनंदीबाई–हा हा हा ! गंभीरराव, आपणाला येत नाहीं त्याची फुशारकी मारूं नये.

---

१ महाराजांना मी नम्र सेवक. २ आपली प्रकृति चांगली आहे ह्मणून मला बरें वाटतें. ३ हवा फार चांगली आहे, कशी काय खबर ?

मोहना—हा हा हा! मामा, तुम्ही आणि फारशी बोलतां! वः! (त्याजकडे पाहून वेडावते.)

दौलतराव—(जानरावास) भला पक्का कोल्हा!—किती समयसूचकता ही!

जानराव—समयसूचकता, होय;—पण ती माझ्या आंगठी पुरती!! जळो त्याची ती समयसूचकता!

गंभीरराव—काय! मला हांसतात! मराठ्यांचे सैन्यांतील सरदारास हांसतात! हा खचीत मोठा ठक आहे; मी समजून चुकलों. त्याला फारशीची माहिती आहे तशीच लढाईची आहे कीं काय हें मी आतां पाहतों.—(त्याजवळ जाऊन एकीकडे) महाराज, आपण मोठे मूर्ख आहां! याचा अर्थ आपणास समजतो का?

यशवंतराव—नाहीं राव; बायका देखतां अशा बेअदबीकडे आम्हीं कधीं लक्ष देत नाहीं. मग कधीं तरी पाहिजे असल्यास दोन हात एकमेकांस दाखवूं.

गंभीरराव—चिंता नाहीं. मी संधी आणून देतों.

आनंदीबाई—भाऊ, तूं कोणीकडे चाललास?

गंभीरराव—फारशी शिकायाला जातों.

दौलतराव—(जानरावास) चला त्याचे मागून जाऊं आणि त्याला शांत करूं; त्याला कांहीं संशय आला आहे असें खरोखर दिसतें.

जानराव—होय, पण माझी हिऱ्याची आंगठी!—

दौलतराव—आणि माझी डबी!—आम्हा प्रजेवर करांचा केवढा हा कहर! आतां आपला हात आखडला पाहिजे, आणि राजेसाहेबांस पदच्युत केलें पाहिजे.

ज्ञानराव—हे महाराज तर बेडकांचा राजा जो पक्षी करकोच त्याप्रमाणें आह्मांवर जुलूम करितात.

[ दौलतराव आणि ज्ञानराव जातात. ]

आनंदीबाई—( यशवंतरावास ) त्या गंभीररावाचे दुःसह दांडगेपणाकरितां मी पदर पसरतें.

मोहना—खरेंच, त्यांचें अंतःकरण चांगलें आहे ह्मणून त्यांच्या दांडगेपणाची क्षमा कराल.

यशवंतराव—आणि तूं त्यांची भाची आहेस ह्मणूनही क्षमा करणें बरोबर आहे—मामी! थोर पदवींत एक मोठें सौख्य असतें—आपणास आपल्या योग्यतेची इतकी खात्री असते कीं, आपणास क्षुल्लक गोष्टीचा लवकर राग येत नाहीं. शिवाय गंभीररावांनीं शत्रूला कधींही सोडिलें नाहीं, ह्मणून मित्रांनीं त्यांच्या क्षुल्लक अपराधांकडे लक्ष देऊं नये, हें उचित आहे.

मोहना—होय, ते जितके बोलण्यांत दांडगे दिसतात तितकेच लढाईंत शूर आहेत. ते आपल्या शौर्यावर या पदवीस चढले आहेत!—आणि दोन वर्षांत!

यशवंतराव—दोन वर्षांत!—दोन वर्षेंच ना ह्मणालीस तूं?

आनंदीबाई—( एकीकडे ) पोरींना आपल्या प्रियकरांबरोबर एकट्या सोडणें मला बरें वाटत नाहीं, पण आपल्या राजपुत्राबरोबर ठेवण्यास कुरकुरणें हें हलकटपणाचेंच काम आहे. [ घरांत जाते. ]

यशवंतराव—मोठ्या कुळांत जन्मला ह्मणून नाहीं, तर स्वपराक्रमावर जो नांवास चढला त्याच्याशीं तुझा संबंध असल्यानें तुला अभिमान वाटत असेल, नाहीं?

मोहना—होय; पण—

**यशवंतराव**-पण काय प्रिये?

**मोहना**-पिढीजादे मोठे घराण्यांतलें असणें यांत कांहीं शोभा विशेष आहे. ज्यांचे वाडवडील नामांकित असतात, तो जसा कांहीं पुरातन कालची मूर्ति होय.

**यशवंतराव**-होय; पण, तो इतर मूर्तीप्रमाणेंच नकू हिश्शांनीं मुखस्तंभ असतो. मोहने! खरोखर जे मोठे आहेत ते गत कालाकडे लक्ष देत नाहींत, तर पुढें येणाऱ्या कालावर त्यांची दृष्टि असते. कारण संतति चांगली निघाली तर पूर्वजांस शोभा, नाहीं तर बट्टाच कीं नाहीं?

**मोहना**-हें मला गोड वाटण्याकरितां ह्मणायाचें; कारण माझे पूर्वज नामांकित नाहींत. पण आपणाला तर मोठ्या कुलाचा अभिमान असेल?

**यशवंतराव**-नाहीं नाहीं! जरी मी सार्वभौम झालों तरी मला मेळें अन्न खाणें गोड वाटणार नाहीं. कूळ आणि शीळ यांपासून आळसाचें वारसपत्र प्राप्त न होतां, उद्योग करण्यास उत्तेजन मिळालें तर मी त्यांस सन्मान देतों. माझ्या पूर्वजांनीं महान् कृत्यें करून अचिर कीर्ति संपादिली ह्मणून मी त्यांस मान देतों, आणि माझेंही नांव त्यांच्या प्रमाणेंच अमर व्हावें, असें मी इच्छितों. त्यांच्या पराक्रमामुळें मला उत्तेजन येतें, हाच त्यांचा मोठेपणा. काय करावें! मला वाटतें तसें प्रिये तुला वाटत नाहीं!

**मोहना**-जेव्हां मी आपणाकडे पाहतें आणि आपण मजवर प्रेम करतां असें जाणतें, तेव्हां माझ्यानें अभिमान टाकवत नाहीं. महाराज, मला आपलें तें सरोवराचे कांठावरील मंदिर कसें आहे तें पुन्हां एकदां सांगा. या मोहनेवांचून आपलें सर्व वैभव अगदीं शून्य आहे असें सांगितल्यापासून

त्याचें वर्णन मला अधिकच गोड वाटतें. आणि वर्णन करितेवेळीं आपल्या मुद्रेवरून तिरस्कार आणि धिक्कार हीं इतकीं उघड दिसून येतात कीं, संवयीमुळें मोठेपणाची आपणास खातर दिसत नाहीं असें वाटतें.

यशवंतराव—मी त्या मंदिराचें वर्णन करीत नाहीं. परंतु हे प्रिये! तुझी जर मर्जी असेल, तर माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण होऊन मिळणारें जें मंदिर त्याचें वर्णन करितों. तेथें मी तुला नेईन. तर ऐक—

साक्या.

आरामाच्या सभोंवतालीं उंच हिमालय आहे,
जाणों दुर्जन निवारण्यास्तव तेथें उद्यत राहे! १
स्वच्छ जयाचें उदक सरोवर तेथ मनोहर पाहीं,
चौबाजूंनीं शोभति तरुवर लवले पक्व फलांहीं. २
मंद समीरण वाहुनि सारे पादप डोलति मोदें,
मंजुल रवही करिती तेथें, वनदेवी गे नांदे. ३
या आरामीं दुर्दिनें कैसा ठावें ना अवलोकीं;
इच्छीं तुजला प्रिये कदापि न दुर्दिन येवो लोकीं. ४

मोहना—वः, किती सुंदर तरी हें!

यशवंतराव—

सदासर्वदा वसंत ऋतु ज्या उपवनिं हर्षें नांदे,
तयांत माझें मंदिर सुंदर विलसे,—मोदा जें दे. ५
भित्ती त्याच्या स्फटिकमणीच्या स्वच्छ विराजति साच्या;
निबिड लतांचे कुंज पसरले सभोंवतीही त्यांच्या. ६
छाया शीतल संतोषा दे, कोकिल गाती गोड,

१. अभ्रांनीं आच्छादित दिवस, पक्षीं वाईट दिवस.

त्वदीय मोहक नाम तयांनीं गावें—ही मम कोड. ७
प्रखर तळपतो रवि त्या काळीं बैसूं आपण दोघें
लतामंडपीं गोष्टी सांगुनि, बहुत सुखातें तूं घे. ८
देवदयेनें आहे यौवन, प्रेमहि रक्षियलेंसें,
तोंवर—नाहीं सुख या लोकीं—मानूं वच हें कैसें? ९
कामाराधनपर जे त्यांतें अपुले मित्र करूं या;
त्यांशीं आपण करूं प्रिये गे प्रीतीविषयींच ईर्ष्या. १०
कामविषयक ग्रंथां वाचूं इतर ग्रंथ न साहे,
कळेल तेव्हां अह्मां किती ही वाणी निर्बल आहे. ११
वर्णाया ती समर्थ नाहीं अमुचे गूढ विचार,
हें जाणूनी होइल आह्मा नवल सखे! अनिवार. १२
सुगंध तैलें प्रदीप भरले तेजा टाकिति दूर,
पक्षी यांच्या मधुर गायना वाही मंद समीर. १३
मंजुल वाद्याचा रव परिसुनि कर्ण सुखानें भरतीं,
गुलाब कुसुमांमधुनि फवारे कारंज्यांचे उडती. १४
रात्रीं पडतें स्वच्छ चांदणें बैसूं आपण तेव्हां.
बोलूं कवण्या स्वर्गी जाऊं अमरहि होऊं जेव्हां? १५

कां, हें वर्णन तुला कसें आवडलें?

**मोहना**—जसा एखादा मधुप कमलाला, तशी मीं आपल्या वक्तृत्वाला मोहून गेलें. मजसारखी सुखी कोण आहे? मी तुह्मांवर प्रीति करून वेडी झालें, यांत नवल तें काय? तुह्मांवर मजसारखी कोण नाहीं प्रीति करणार?

**यशवंतराव**—(लावून) स्त्रियांचें हृदय कोणाला कळणार आहे!! मी राजपुत्र आहें ह्मणून तुझी प्रीति मजवर आहे. माझ्या अंगीं गुण चांगले आहेत ह्मणून कांहीं मजवर तुझी प्रीति नाहीं. आतां हें वैभव, ही दौलत आणि

ही सत्ता यांबद्दल दारिद्र्य, कष्ट आणि काळजी ह्यांचें जर मीं वर्णन केलें असतें तर माझ्या वक्तृत्वपुष्पमकरंदास तू भुलून जाऊन प्रीति केली असतीस काय? मोहने, ही खरी प्रीति नव्हे.

मोहना—महाराज! या कठोर शब्दांनीं मला दुःख होतें. हें खरें कीं, अगोदरच वृद्धिंगत झालेल्या माझ्या गर्वास खाजें मिळालें नसतें तर पहिल्यानें मी वश झालें नसतें; पण आतां खचीत खात्री ठेवा कीं, आपण राज्यभ्रष्ट झालां किंवा कांहीं झालें तरी—

यशवंतराव—ज्यानें तुजविषयीं आपली प्रीति दर्शविली त्या माळ्यांच्या मुला इतका नीच झालों तर?

मोहना—तरीही आपण मला अधिकच प्रियकर व्हाल. कारण स्त्रियांची प्रीति कितपत असते हें दाखविण्याची मला संधी सांपडेल. आह्मी बायका पतंगाप्रमाणें आहों. एकदां दिव्याची जोत दृष्टीस पडली, कीं घातलीच त्यावर उडी. पण एकदां पंख भाजले ह्मणजे मग दैदीप्यमान जरी दुसरा एखादा पदार्थ दृष्टीस पडला तरी त्याकडे धांव येणार नाहीं, तर जीव जाई तों तेथेंच आमचें मन राहतें.

यशवंतराव—काय तुझी ही एकनिष्ठा! (एकीकडे) अरे रे! माझें मन मलाच खातें. तर माझ्या हातून अशी कधींही गोष्ट घडणार नाहीं. पूर्वी तिच्या धिक्कारामुळें मला दुःख झालें हें खरें. पण सध्यांच्या तिच्या अतिशय प्रीतीनें जें दुःख होतें त्यापुढें तें पूर्वीचें कांहींच नाहीं. तर मी आतां दौलतरावाकडे जातों,—अरे पण तोच इकडे येत आहे-प्रिये! मला क्षणभर त्यापाशीं बोलण्यास जाऊंदे; मी याच पावलीं परत येतों.

मोहना— फार वेळ लावूं नका हो ! [जाते.]

[दौलतराव व जानराव येतात.]

यशवंतराव— मला माझे शपथेपासून मोकळें करा—मी तिच्याशीं लग्न लावणार नाहीं !

दौलतराव— तर मग खोट्या शपथेंत तूं येशील.

यशवंतराव— तिच्या बरोबर लग्न करण्याची शपथ मीं वाहिली तेव्हां मी शुद्धीवर नव्हतों. तिनें माझा तिरस्कार केला हेंच तेव्हां मला दिसत होतें. कामामुळें आणि संतापामुळें मला कांहीं सुचत नव्हतें. द्या तें मला माझें दारिद्र्य आणि भलेपण.

दौलतराव— आतां ती वेळ गेली—आतां तुह्मांला तिच्याशीं लग्न लाविलें पाहिजे आणि तें आजच्या आज. मीं एक गप्प योजून ठेविली आहे, आणि ती सर्वांस खरी वाटेल. गंभीररावाचे मनांत आपणाविषयीं संशय आला आहे. आणि तो त्या कामास चौकीदारास लावील. आपण पकडले जाल— मोहना आपल्या नांवानें बोटें मोडून शिव्या देईल, आणि आपणास मोठा भामट्या आणि ठक समजून कैदेंत टाकतील.

यशवंतराव— तूं राक्षस आहेस !

दौलतराव— मग ती आपल्या रागाच्या सपाट्यांत— आणि रागाच्या सपाट्यांत कोण काय करणार नाहीं!—आणि आईबापांच्या लाजेसाठीं जो कोणी प्रथम तिजजवळ लग्नाची गोष्ट काढील त्याला ती वरील—आणि मग कदाचित् हा आपला नम्र सेवक देखील तिला चालेल!

यशवंतराव— काय तुला वरील ! नाहीं; तसें झालें तर फारच वाईट. कारण तुला दया ह्मणून मुळींच नाहीं.

तर मीच आपला तिशीं लग्न लावितों आणि आपली शपथ खरी करितों. तर आतां त्वरा करा, आणि जी कांहीं आपली लबाडीची युक्ति आहे ती लवकर योजा. नाहीं तर मी तुमचा किंवा आपला स्वतांचा प्राण घेईन.

ज्ञानराव— केवढें धारिष्ट हें ! राजपुत्राची वृत्ति सौम्य असली पाहिजे ! असा क्रूरपणा तैमूरलंगासच साजतो.

दौलतराव—पुरे आतां—मी त्वरा करितों, आपली तयारी असूंदे.

[ दौलतराव व ज्ञानराव निघून जातात. गंभीरराव दोन तरवारी घेऊन येतो. ]

गंभीरराव— महाराज ! आतां बायांची खबर येथें कांहीं चालणार नाहीं. त्या पाहा मी आपणाकरितां दोन पोथ्या आणिल्या आहेत, त्या कशा काय आपण लावितां पाहूं.

यशवंतराव— राव ! चालत व्हा, ही वेळ थट्टेची नव्हे.

गंभीरराव— मला वाटतें, आपणास कांहीं व्याकरणाचें अंग आहे,—आपणाला 'खड्ग' शब्द चांगला चालवितां येतो. पण तेवढें पुरेसें नाहीं. आपणास धातुकोश पढलाच पाहिजे.

यशवंतराव— हा मूर्ख !

गंभीरराव—महाराज ! मुलगे आईचे वळणावर जातात, ह्मणून ज्यानें मला मूर्ख ह्मटलें त्यानें माझे आईची अप्रतिष्ठा केली असें मी समजतों. आतां बच्याराम आपणास दुसरा मार्गच नाहीं. दोन हात केलेच पाहिजेत, नाहीं तर—

यशवंतराव— बस, पुरे करा. हा मी सिद्ध आहें. राहा पाहूं नीट उभे.

[दोघे लढतात, गंभीररावाची तरवार खालीं पडते, ती यशवंतराव उचलून त्यास मोठ्या आदरानें देतो. ]

शूर शिपायास यापेक्षां योग्य दुसरी शिक्षा नाहीं. इतकी पुरे आहे.

**गंभीरराव**— महाराज, आपण फारच चांगले तरवारीचे हात करितां. आपण गृहस्थ असलांच पाहिजेत. आपण राजपुत्र असा कीं नसा, त्याविषयीं मला काडीची सुद्धां जरूर नाहीं; पण ज्या मनुष्यास पट्टा आणि तरवार चांगली खेळतां येते, तो सभ्य असलाच पाहिजे.

**यशवंतराव**—[ एकीकडे ] अरेरे! मी असा दगलबाज निवडण्यापूर्वीं सभ्य होतों खरा; कारण जे भलेपणानें वागतात तेंच मूळचे सभ्य होत. सुभेदार, मी ऐकतों, आपण शिपायापासून या पदवीवर चढलां आहां.

**गंभीरराव**— होय.

**यशवंतराव**— आणि तें सगळें दोन वर्षांत!

**गंभीरराव**— तेंही खरें आहे. हल्लीं आमच्या लष्करांत या गोष्टीचें कांहीं नवल नाहीं. यांत काय, आमचा मुख्य सरलष्कर आहे तो अवघा तीस वर्षांचा आहे, आणि दुसरे कितीएक वीस बावीस वर्षांचेच आहेत.

**यशवंतराव**— काय बावीस वर्षांचेच!

**गंभीरराव**— होय, आतांशा आमच्या मराठ्यांच्या फौजेंत बढती होण्याला कांहीं उशीर लागत नाहीं. आह्मांपैकीं कोण केव्हां सरलश्कर होईल याचा नेम नाहीं. आह्मांस शत्रूवर तुटून पडण्याचें कांहींच भय वाटत नाहीं. कारण जय मिळवावा एवढीच आमची इच्छा आहे.

**यशवंतराव**— वीस बावीस वर्षांचे वयांत—आणि सरलष्कर! [ थोडासा वळून ] महाराज, असा एखादा सुदिन येईल, कीं मी आपणापाशीं एक विनंती करीन.

**गंभीरराव**—आणि ती मी मोठ्या आनंदानें कबूल करीन. (यशवंतराव दुसरीकडे वळतो.) मीं ज्याशीं दोन हात करून खातरी करून घेतली तो पहा मला किती आवडतो तो ! [ तरवार लाविती. ]

[ आनंदीबाई आणि दौलतराव येतात. ]

**आनंदीबाई**— महाराज–राजे साहेब ! मीं काय ऐकलें हें ? आह्मांला सोडून आपणांस लवकर येथून गेलें पाहिजे!

**यशवंतराव**— मला ?—

**दौलतराव**—होय महाराज ! हें पहा पत्र आतांच राजगडाहून माझ्या मित्रानें मला पाठविलें आहे. त्यांत आपणाविषयीं तेथें असा संशय आला आहे कीं, आपण दिल्लीकडून कांहीं राजकीय उलथापालथीचे विचारानें आलां आहां. आणि करवीरांतील मोठमोठ्या घराण्यांशीं आपला परिचय होत चालला आहे, ह्मणून आपणावर फितुरीचा मोठा वहीम आहे. याकरितां आपण येथून लवकर पळून जावें. नाहीं तर आपणास पकडून किल्ल्यावर टाकतील,—कदाचित् सुळींही देतील. तर लवकर पळा !—मी आतांच घोडे तयार करून आणवितों. आपण विजापुराकडे चालते व्हा. आणि तिकडून मग काश्मीराकडे जातां येईल.

**आनंदीबाई**—आणि माझ्या मोहनेची मग काय वाट ? सरशेवटीं वाटतें राणीची आई म्हणून घ्यायाचें नाहीं माझ्या कपाळीं !

[ मोहना आणि देवराव येतात. ]

**मोहना**—[ यशवंतरावाच्या गळां पडून ] आपण जातां !—या मोहनेला सोडून जातां ?—

**दौलतराव**—आतां क्षणभरही विलंब लावूं नका.

**देवराव**—मी आतां कोतवालाकडे जाऊन शोध करितों.

**दौलतराव**–मग तर गोष्ट गमावलीच; यांच्यावर वहीम आहे असें कोतवालाला समजल्याबरोबर यांस कैद करण्यास तो हुकूम देईल.

**आनंदीबाई**–तर मग माझ्या प्रारब्धीं नाहीं तर राजाची सासू होण्याचें!

**दौलतराव**–नाहीं तें का? इतकें केलें म्हणजे झालें.–भटजींला बोलावा–आज गोरज मुहूर्तही चांगला आहे–लावा हळदी आणि पडूं द्या एकदांच्या अक्षता त्यांच्या मस्तकीं. म्हणजे राजेसाहेब लागलींच आपले राणीसाहेबांना बरोबर नेतील.

**यशवंतराव**- तसें होणें अशक्य आहे. [एकीकडे] हा अधमा!

**आनंदीबाई**-काय मीं माझें सोनतुकडें गमवावें!

**दौलतराव**–पण ती राजाची राणी होणार ना?

**आनंदीबाई**–अहो दौलतराव, मी तुमची केवढी आभारी आहें! तुमचें म्हणणें मला पसंत पडतें. आम्ही मुलीला जवळ ठेवूं म्हटलें तर कसें चालतें? तिच्या सुखाकडे पाहिलें पाहिजे. ती आज नाहीं उद्यां जायाचीच. पण आज दिली तर तिला रथ किंवा अंबारी असायास मिळेल!

**मोहना**–आपण येथें अजून आहां हें बरें आहे. आपणास सोडून जर मी राहिलें तर माझें काळीज फाटून जाईल.

**यशवंतराव**-पण तूं अशा घाईघाईनें लग्न लावून घेशील? तूं मजसारख्या भ्रष्टास व पळपुट्यास वरिशील?

**मोहना**–अरेरे! आपला जीव संकटांत पडला तर त्याचा वांटेदार मोहनेशिवाय दुसरा कोण होणार आहे?

यशवंतराव–[ एकीकडे ] हरहर ! यापेक्षां पृथ्वी मला गिळून टाकती तर बरें होतें !

देवराव–थांबा ! थांबा! देण्याघेण्याचा कसा काय ठराव केला आहे ? हुंडा काय घेणार ?

यशवंतराव–मी नाहीं इतका हलकट; नाहीं, हुंडा एक कवडी देखील कबूल करणार नाहीं !

दौलतराव–[ आनंदीबाईस ] वः खूब केली ! आपले यजमान तर अशा गोष्टींत देखील सराफी आणतात. देवराव, राजेसाहेब काय बोलले हें आपण ऐकलेंच आहे. आपण या गोष्टी त्यांच्या देखत काढूं नये. तुम्ही म्हणतां याचा विचार मागाहून करूं आपण.

देवराव–पण–

आनंदीबाई–आपण आपली जीभ आटोपाल का पण !–कांहीं कळत नाहीं ना वळत नाहीं !

दौलतराव–मी आतां इतक्यांत भटजीबोवांना आणिलेंच म्हणा; जा तुम्ही सर्व तयारीला लागा; संस्कार आटपण्याच्यापूर्वींच रथ तयार होऊन येईल.

आनंदीबाई–दौलतराव ! रथाला सहा घोडे असायाचे, आठवण आहेना ? आपण फारच चांगले, कीं आपणाला नाकारिलें असतां आपण त्याचा राग धरिला नाहीं. पण पाहा बरें, नाकारिलें नसतें तर पोर राजाच्या घरांत पडली नसती.

दौलतराव–आनंदीबाई,–आणि असा राजपुत्र! खरोखर अशा वैभवी पुरुषाच्या पदरीं आपली पोर पडली म्हणून मला मुळींच वाईट वाटत नाहीं. [ एकीकडे ] मी त्यांच्या रथामागून त्या खेड्यापर्यंत जाईन, आणि माझा यत्न सि-

द्वीस गेला म्हणून पोटभर हंसेन. आणि उद्यां इला दुःख झालें आणि इची फजिती झाली, म्हणजे या नाकानें वांगीं सोलणाऱ्या मोहनेस माळ्याच्या पोरास सोडून माझा अंगीकार करावा हें बरें वाटेल. [जातो.]

आनंदीबाई—या आतां, आणि या भावी राणीसाहेबांस अंतःपटाजवळ न्या.

देवराव—मला नाहीं ही असली घाई आवडत. आमच्या पेढीवर असली चाल नाहीं.

आनंदीबाई—आपणांस वाटत असेल आपण दुकानींच आहों म्हणून, नाहीं बरें?

यशवंतराव—थांब, थांब, प्रिये—एक शब्द बोलूं दे. तुला कांहीं संशय येत नाहीं? कांहीं भयही नाहीं वाटत? कांहीं असेल तर बोल,—अजून वेळ गेली नाहीं.

मोहना—एकदां मी आपणाला माझें असें म्हटल्यावर, जें आपल्या जिवाला सुख किंवा दुःख होतें त्याची वांटेकरीण मी आहें, असें मी पक्कें समजतें.

गंभीरराव—ठीक, राजेसाहेब, ठीक आहे! आपण मोठे भाग्यवान कीं, तिची आपणावर इतकी प्रीति आहे. ही पोर एकंदरींत मोठी चांगली आहे. तिला चांगलें सुख द्या. [पाठीवर शाबासकी देऊन] येतों महाराज, रामराम, आपणा उभयतांस यश आणि सुख प्राप्त होवो. तुमचें सुख मला असतें तर बरें झालें असतें.

यशवंतराव—[विचारांत एकीकडे उभा आहे] खरोखर म्हणतां का? एकमेकांस आपण चांगलेच ओळखतों म्हणायाचें! काय? "तिचें मन मिळवा, तिशीं लग्न लावा, आणि तिला घरीं घेऊन जा"-अरेरे! हाच तो करार! त्यां

पूर्वानें याच करारापायीं आपणाला विकून घेतलें! पण—पण पुढें काय? काय? हिला घेऊन दूर निघून जाऊं? अरेरे! ती गोष्ट मी मनांत देखील आणणार नाहीं! लहान मुलें अंधारांत असतांना भीत असतात आणि बागूलबोग अथवा राक्षस केव्हां येऊन गट्ट करील नेम नाहीं असें त्यांना वाटत असतें. त्याप्रमाणें माझ्या मनाची स्थिति झाली आहे! माझ्या स्थितीची इच्छा कारितां अं! फार चांगलें! मला यांत किती आनंद होत असेल तो तुह्मांला माझ्या मुद्रेवरूनच कळेल! वाहवा! जर अंतःकरणवृत्ति एकमेकांच्या एकमेकांना ऐकूं येऊं शकत्या, तर तुह्मी "तुमचें सुख मला असतें तर बरें होतें.—" असें ह्मटल्याबरोबर माझी अंतःकरणवृत्ति काय जबाब देती तें तुह्मांला ऐकूं आलें असतें!

[निघून जातो.]

**अंक दुसरा समाप्त.**

## अंक ३–प्रवेश १.

[ धर्मशाळेचे बाहेरले आंगास–संध्याकाळची वेळ–हा प्रवेश सुरू असतां चंद्रोदय होतो. विठोबा आणि त्याची मुलगी जमनी धर्मशाळेंतून बाहेर येतात. ]

**विठोबा**– वाहावारे वाहावा ! खरेंच, हें मी कधीं विसरणार नाहीं. आपला यशवंता आतां मोठा राजा बनला! त्याचा रथ माझ्या धर्मशाळेशींच मोडला–हा–हा–हा!

**जमनी**– आणि त्या बाईसाहेब तरी किती मिजास करितात पाहा ! ती मला मोठ्या दिमाखानें विचारते–" मुली, तुमच्या घरांतली उत्तम खोली ती हीच का ? "

**विठोबा**– बरें जमने, तूं आंत जा; आणि जेवणाची तयारी कर. सर्व चाकर लोकांस जेवूं खावूं घालून परत वाटेस लाविलें पाहिजे. [ जातात. ]

[ दौलतराव आणि ज्ञानराव येतात. ]

**दौलतराव**– आपल्या राणी साहेब आज एका मुक्कामास तर आल्या–आणखी एक मजल गेल्या ह्मणजे त्यांचा प्रवास संपेल, आणि मग त्या काश्मीरांतील आपल्या सुंदर मंदिरांत जातील ! हा–हा–हा ! !

**ज्ञानराव**– खरोखर, त्या मोहनेची मला दया येते. आणिं जर तिला येथें जेवायचें असेल तर मग फारच फजीती. [ तोंड वाईट करतो. ] येथील जेवणाचा अनुभव मला आहे–मी तें कधीं विसरणार नाहीं.

[ यशवंतराव धर्मशाळेंतून बाहेर येतो. ]

**दौलतराव**– महाराज, आपला दास हजर आहे. आपण फारच योग्य रीतीनें अधिकार चालविला. पण आपण

पदभ्रष्ट झालां ह्मणून मला फार दुःख होत आहे. मला वाटतें, राजे साहेबांचे पदरचे लोक फारसे विश्वासू आणि प्रामाणिक नाहींत. आणि ते आपणास याच प्रसंगीं सोडून जातील असें दिसतें—मोठेपणाचें कपाळच हें—बरें असो, पण आपला हा उत्तम पोशाक व ती 'दिल्लीच्या बादशाहानें आपल्या पणजास दिलेली जडिताची डबी' आपणास बक्षीस असो.

ज्ञानराव— आणि ती आपल्या 'मावशीनें दिलेली आंगठी' ही त्याजबरोबर द्या.

यशवंतराव—गृहस्थ हो, मी आपल्या शपथेप्रमाणें वागलों, खरें कीं नाहीं ?

दौलतराव—खरोखर, सत्यास स्मरून वागलां.

यशवंतराव—तर मग आतां तुमचा आमचा अर्थाअर्थी संबंध तुटला—आतां धरा आपण आपली वाट पाहूं!

दौलतराव—काय ह्मणतोस लुच्चा ?

यशवंतराव—पाहा, आपला करार पुरा झाला. आपण आज मोठी तरवार मारली आणि काय तें एका बापड्या गरीब मुलीस नाडिलें,-तिचे नांवाला बट्टा लाविला,-तिचे जीविताची माती करून सोडली,-आणि तिच्या तारुण्यांतील सर्व आशेचा समूळ नाश केला. हाच तुमचा पराक्रम आणि माझा फजिता ! [ दौलतरावाकडे वळून ] आतां तूं आपले कृत्याचा आनंद मान, पण तो माझ्या समोर नको. मीं तिचा विश्वासघात केला खरा; पण आतां मी तिचा रक्षक झालों आहें. आतां तिचे वाटेस तर जा,—किंवा एक धिक्काराचा शब्द तर काढ,-किंवा वांकड्या नजरेनें पाहा,—किंवा वेडावण्याकरितां ओंठ हलव तर बघूं, म्हण-

मग तुझ्यामुळें पश्चात्तापाचा जो ठसा माझे अंतःकरणा-वर उमटला आहे, त्याचा तुला अनुभव दाखवीन!

दौलतराव—काय आपले राजेसाहेबांचें पांडित्य हें!

यशवंतराव—आतां मला राजेसाहेब म्हणूं नका! ध्या-नांत ठेवा! खेदामुळें माझे वृत्तींत पालट झाला आहे. येथून चालते व्हा कसे! मी काय करीन याचा भरंवसा नाहीं. पळा येथून!

ज्ञानराव—[एकीकडे] हा मोठा आडदांड आहे. यापाशीं कांहीं बोलायची सोय नाहीं. चला दौलतराव, चला येथून.

दौलतराव—मोठे लोकांचा कसा मान राखावा हें मला कळतें. राजेसाहेब, मुजरा येतो. करवीरांत कोणाला कांहीं हुकूम सांगायाचा आहे? पण थांबा—मी आपणाला लग्नाच्या दिवशीं दोनशें रुपये देण्याचें कबूल केलें होतें; ते हे घ्या. [थैली पुढें ठेवितो.]

यशवंतराव—[थैली जमिनीवर आपटून] मीं तुला सूड उगवून दिला, पण तो कांहीं तुला विकला नाहीं. घे ते आपले रुपये, उचल लवकर.—असें! कसें लवावें हें तुला शिकविलें पाहिजे.

दौलतराव—तुला याबद्दल माझी कधींना कधीं तरी क्षमा मागावी लागेल. [ज्ञानरावास एकीकडे] चला आतां माझ्या बागेंतल्या बंगल्यांत-येथें उद्यां येऊन मोहनेला आपली नवीन पद्धती कशी काय आवडते तें पाहिलें पाहिजे.

यशवंतराव—कां, अझून येथून गेलां कां नाहीं?

दौलतराव—आज्ञा महाराज, आपल्या आज्ञा धारक—परम विश्वासू—

जानराव–आणि अति दीन दासांचा मुजरा येतो.–हा–हा–हा !

[ दौलतराव आणि जानराव जातात. ]

यशवंतराव ईश्वरी कृपाच समजायाची कीं, माझे हातांत कांहीं शस्त्र नव्हतें. नाहीं पेक्षां मी त्यांचा जीवच घेतला असता. काय मी हतभाग्य! आतां कोणाशीं बोलावें ! कोणीकडे जावें ! जिकडे पाहावें तिकडे थट्टाच !–आंतील धनगर सुद्धां माझी थट्टा करीत आहेत! [ आंतून मोठें हंसूं ऐकूं येतें ]–आतां इतक्या थोड्या अवकाशांत जर का भ्रमाचा भोंपळा फुटला असेल, तर मग काय करावें ? आतां तिला बोलवावें आणि येथून जावें हें बरें. मीं आतांच एका विश्वासू मनुष्यास आईकडे पाठविलें आहे–तेथें आम्ही निर्धास्तपणें राहूं. निदान त्या घरीं तरी इच्या दुःखावर डाग देणारा कोणी नाहीं, आणि तिचे लाजेचा आनंद मानणार नाहीं ! तिनें या अशा दुष्ट मनुष्यावर प्रीति करण्याची आगभाक केली हें तिला तेथेंच समजलें पाहिजे.

[ यशवंतराव दरवाड्याकडे फिरतो. इतक्यांत मोहना बाहेर येते.]

मोहना– प्राणनाथ, कसली जागा ही ! मी असले दांडगे लोक कोठेंही पाहिले नाहींत. ते मजकडे रोखून पाहतात आणि एकमेकांस खुणा करितात. मला वाटतें, आपण वेष पालटून फिरतांहां, तरी नुसतें महाराजांस पाहूनच त्यांचीं डोकीं फिरून गेलीं आहेत. काय दैवगती ही, येथेंच कां आपला रथ मोडावा ! मला वाटतें, आपली तबियत बरी नाहीं–ते पहा कपाळावर घामाचे बिंदु आले आहेत–आणि हातही ऊन लागतात.

यशवंतराव–छे, तसें नव्हे; ही लहर आतां निघून जाईल. ही हवा–

मोहना–आपले तिकडल्या मंद हवेप्रमाणें नव्हे–(थांबून) अग बाई! किती तरी फिके पडले हे! कांहीं म्हणा, आपली प्रकृति बरी नाहीं. आपले चाकर लोक कोठें गेले? मी त्यांना हाक मारितें. [जाऊं लागते.]

यशवंतराव–थांब थांब! मी–माझी प्रकृति बरी आहे.

मोहना–प्रकृति बरी आहे! हं, मी समजलें आतां. आपणास वाटत आहे कीं, या असल्या घाणेरड्या जागेंत, वात्रट माणसांनीं आणि घुटें आणि भाकरी यांनीं मला फार त्रासविलें आहे. आणि ती गोष्ट खरी आहे. तरी आपण जवळ आहां या अर्थीं त्या सर्वांचा मला विसर पडतो.

[ विठोबा येतो. त्याचे चाकर त्याचे मागें दडून पाहतात आणि हंसतात.]

विठोबा–महाराज, सरकारच्या मर्जीस आल्यास–

यशवंतराव–जा, चालता हो, तोंड दाखवूं नको!

[ विठोबा हंसत हंसत जातो.]

मोहना–यांना कशी आपली पदवी कळली? चाकर लोकांस फार डौल मिरवावासा वाटतो. प्राणनाथ, याचा राग येऊं देऊं नका. आतां थोड्याच दिवसांनीं आपण आपल्या स्फटिकासारख्या सरोवराचे कांठावरील मंदिरांत जाऊं आणि मग–पण आपल्या हसतमुख चेहऱ्यांत कां आज इतका फरक!–हंसूं खर्च फार झालें म्हणून वाटतें इतकें कृपण व्हायाचें?

यशवंतराव–प्रिये! तुझे नेत्रकटाक्षानें आनंद आणि हंसूं नाहीं तेथें उत्पन्न होईल. आतां चला आपण या अडाणी आणि मूर्ख लोकांची संगत सोडूं, आणि जवळच एक

झोंपडी आहे तेथें जाऊं. मीं तेथें आपणास रात्रीं राहण्यासारखी तजवीज करविली आहे. ती झोंपडी खरी, पण कीं प्रामाणिक माणसाची आहे, आणि तेथें असल्या हलकट आणि वात्रट लोकांचा वाराही येणार नाहीं. काय उत्तम रात्र ही ! हवाही सुखकारक सुटली आहे, आणि चांदणें इतकें आल्हादकारक पडलें आहे कीं, जणु कांहीं तें आपणास फिरावयासच बोलावीत आहे. चल आपण तेथपर्यंत चालतच जाऊं. मला या वाटेचा खडानखडा माहीत आहे.

मोहना–काय आपणाला ! मला वाटत होतें कीं, आपण या ठिकाणीं अगदीं गैरमाहीत आहां. हां ! समजलें, तेथील कोण्या सुंदरीनें आपल्यास मोहनी घातली होती. आतां तरी आपण एकनिष्ठ आहां ना ?

यशवंतराव–खरोखरच.

मोहना–राजे लोक इतके चंचल स्वभावाचे असतात ना?

यशवंतराव–प्रिये, चल आतां.

मोहना–मी आपल्या मशालजीला हाक मारूं का ?

यशवंतराव–देवानें आपणाकरितां आकाशांत मशाली पेटवून ठेविल्या आहेत. आणि तें झोंपडेंही कांहीं फार दूर नाहीं.

मोहना–ही रात्रीची झुळूक माझ्या अंगाला झोंबते.

यशवंतराव– तर हें पांघरूण घे. ( तिला आपली शाल गुंडाळतो.) थंडी ही फारशी नाहीं.

मोहना–आपण प्रसन्न असतां ती कोठून असणार !

यशवंतराव–( एकीकडे )क्षमस्व परमेश्वर !(निघून जातात.)

## प्रवेश २.

[यशवंतरावाची झोंपडी. म्हातारी जिजाबाई गडबडीनें इकडून तिकडे फिरत आहे. जेवायाचीं ताटें मांडलीं आहेत.]

म्हातारी जिजाबाई–हां, आतां हें ध्यान दिसतें. त्यानें मला निरोप पाठविला आहे कीं, मी आतां इतक्यांत घरीं येतों. त्याचें कुळशीळ तिनें कांहींच लक्षांत आणलें नाहीं, याजवरून वाटतें, तिची त्याजवर फारच प्रीति जडली असावी. कारण त्याला सोंग देऊन जरी तिजकडे नेलें आहे, तरी तो इतका प्रामाणिक आहे कीं, आपलें सर्व कृत्रिम तिला सांगितल्यावांचून राहणार नाहीं; आणि त्या कृत्रिमाबद्दल तिनें प्रीतीमुळेंच क्षमा केली असावी. यांत कांहीं विशेष नाहीं; कारण माझा मुलगा जरी राजा नाहीं तरी तो राजा होण्यास योग्य आहे,–एकूण एकच. [दारावर थाप ऐकू येते.] हं, ते आले.

[यशवंतराव आणि मोहना येतात.]

म्हातारी–ये बा यशवंता, आलास का तूं, बरें झालें ! –या बोलण्याकरितां मी बाई तुजपुढें पदर पसरतें. माझी याजवर प्रीतिच तशी आहे.

मोहना–अग खरोखर–कां प्राणनाथ, हें काय? ही म्हातारी आपल्या ओळखीची आहे काय? मी समजलें. आपण इजवर कांहीं उपकार केले असतील. हें आणखी एक आपल्या सदय अंतःकरणाचें उदाहरण; नाहीं बरें?

यशवंतराव–माझ्या सदय अंतःकरणाचें,–अरेरे !

मोहना–तर मग राजे साहेब तुमच्या ओळखीचे आहेत वाटतें !

म्हातारी–माझ्या ओळखीचे?–मला वाटतें तूंच त्यांस ओळखीत नाहींस.

**मोहना**–काय ही वेडी तर नाहीं ना? प्राणनाथ, आपण येथें रहावें काय? मला तर इजविषयीं भलतीच शंका येते.

**यशवंतराव**–प्रिये! माझ्यानें नाहीं सांगवत. माझे हात-पाय अगदीं कांपूं लागले; माझी बोबडी वळली;–ज्या मनुष्यानें आपलें नांव बुडविलें तो किती भित्रा असतो! बोल, तिशीं बोल.–( आपले आईस )–तिला सांग कीं–अरे रे! परमेश्वरा, यापेक्षां मरण आलें असतें तर बरें होतें!

**मोहना**–कसे हे अगदीं घाबरल्यासारखे दिसतात!–ही विलक्षण जागा! ही म्हातारी!-हें काय आहे कांहीं कळत नाहीं!–मला संशय येतो–बाई तुम्ही कोण आहां? आहां तरी कोण? उत्तर देववत नाहीं का? तुमचें तोंड कशानें धरलें?

**म्हातारी**–अरे यशवंता, तूं इशीं दगाबाजी तर केली नाहींस ना? थू तुझ्या तोंडावर! मला वाटलें होतें, बोहल्यावर जाण्यापूर्वींच तूं इला सर्व कळविशील.

**मोहना**-सर्व! तें काय?–माझ्या सर्व नाड्याच आखडत चालल्या आहेत!

**म्हातारी**–गरीब बिचारी! यशवंता, मी इला सांगूं का सर्व उघडून? ( यशवंतराव होय म्हणून खूण करितो ) मुली, तुला नाहीं का माहीत हा मुलगा गरीबाचा आहे हें? पण त्याचे आईबाप प्रामाणिक आहेत! तूं माझ्या यशवंताबराबर लग्न लाविलें हें तुला अजून कळलें नाहीं का?

**मोहना**- काय तुमचा मुलगा! पुरे पुरे! मजशीं बोलूं नका! ( यशवंतरावाजवळ जाऊन त्याचे खांद्यावर हात टाकून ) ही

थट्टा आहे काय? खचीत थट्टा आहे. पण आपण इकडे. एकदां हास्यमुख करून पाहा-आणि एक शब्द तरी बोला. माझी आपणावर जी प्रीति आहे तीवरून माझी कांहीं खात्री होत नाहीं, कीं आपण असें-छे, मी नाहीं आपणास कठोर शब्दांनीं दुखविणार.-बरें, बोला एकदांचें काय असेल तें.

**यशवंतराव**-आई, तूं एक क्षणभर बाहेर जा. इतकी मजवर आणि इजवर मेहरबानी कर. जाच एक क्षणभर कशी!

**ह्मातारी**-यशवंता! अरे, तुझी असली फजीती पाहाण्याकरितां काय रे मी इतके दिवस जगलें! मला तुझें मोठें भूषण वाटत असे! [ जिन्यावरून निघून जाते. ]

**मोहना**-काय! या ह्मातारीचा मुलगा!

**यशवंतराव**-ऐक आतां माझें बोलणें.

**मोहना**- काय ऐकायचें आहे! बरें बोला-ह्मातारीचा मुलगा हं! राक्षसास कुठें आईबाप असतात काय? बरें बोला,-ह्मणजे त्यानें तरी माझे शाप ऐकूं येणार नाहींत.

**यशवंतराव**-नाहीं नाहीं, खुशाल शाप दे. तुझ्या शापापेक्षां तुझ्या क्षमेनें मला अधिक वाईट वाटणार आहे.

**मोहना**- ( मोठ्यानें वेड्यासारखें हसून ) हेंच का आपलें तें मंदिर--"संगमरवरी फरशीवर अत्तराचे सडे घातल्यामुळें चोहोंकडे घमघमाट सुटला आहे, आणि वाऱ्याच्या प्रत्येक झुळकीबरोबर बागांतले झाडांवरील गायन करणाऱ्या पक्ष्यांच्या लकेऱ्या ऐकूं येत आहेत! काय हें स्फटिकासारखें स्वच्छ पाण्याचें सरोवर आहे. तुला आवडतें का हें ठिकाण!" ( झोंपड्याकडे बोट करून ) हें माझ्या पतीचें घर आणि हे माझे पति! वाहवारे वाहवा! अरेरे, मी किती मूर्ख-किती वेडी-किती हतभाग्य! हर हर!

आतां पुढें काय होणार तें सर्व दिसत आहे! करवीरांतील सर्व लोक मला हांसतील आणि माझी थट्टा करतील! अरे, कांहो, तुमच्या अंतःकरणांत दयेचा लेश देखील नाहीं आं! जर असेल तर शस्त्रानें हें शिर उडवा, आणि मला वेडाचे यातनेंतून सोडवा---नाहीं नाहीं, अशी गोष्ट होणार नाहीं. हें कांहीं तरी भयंकर स्वप्न आहे. मी यांतून लवकरच जागी होईन. (त्याला हालवून) हें मांसच आहे!—मनुष्यच आहे?—का स्वप्नांत दिसणारी छाया आहे? नव्हे, असें नाहीं, तें खरेंच आहे. मी आपलें असें कोणतें पाप केलें होतें, किंवा कोणता अपराध केला होता, कीं आपण माझी अशी दशा करावी?

यशवंतराव—मोहने, गर्वामुळें देवादिकांच्याही खोडी मोडल्या आहेत—आणि गर्व हाच काय तो या तुझ्या अति सुरूप सुवर्णमय देहांत हिणकस धातु आहे. आणि तो असल्यामुळेंच सूड उगवणाऱ्या निर्दय अंतःकरणाचा अंमल तुजवर चालला. मला समजूं लागल्यापासून तूं माझे मनांत भरलीस, मी तुला बागांतील फुलांचे ताटव्यांतून फिरतांना पुष्कळ वेळां पाहिलें, पण तुझें लक्ष मजकडे कधींही वळलें नाहीं. तुझें त्या वेळचें आनंदभरित आरक्त स्वरूप, मुखावर टवटवी, आणि गालीं हसणें, हीं पाहून असें वाटे कीं, प्रत्यक्ष वसंतऋतूच तुझ्या रूपानें तेथें आला आहे काय! त्या वेळीं तुला पाहिल्यापासून मला मदनानें पीडा केली, आणि तेव्हांपासूनच मी तुझा दास झालों,—आणि असाच शेवटपर्यंत राहीन! बरें ही प्रीति जरी इतकी वेडेपणाची—पाहिजे तर सदोष म्हण—होती, तरी तिजपासूनच निर्मल आशा आणि मोठें होण्याची इच्छा मजमध्यें उत्पन्न झाली. पुराणांतरीं

अशा आपण पुष्कळ गोष्टी ऐकल्या आहेत कीं, मोठमोठ्या राजकुलांतील स्त्रियांनीं गरिबांसही वरिलें आहे. तसेंच, ज्याप्रमाणें मृत्यु सर्व पदवींतील लोकांस एका माळेंत आणतो, त्याप्रमाणें प्रीतिही आणते, आणि रावारंकास सारेखा समजते. हा विचार मनांत आणून मी माझ्या होणाऱ्या भावी स्थितींतच गर्क होऊन गेलों. माझे वडील वारल्यावर मी स्वतांचा मुखत्यार झालों. मग या दरिद्री स्थितींतून कसें सुटावें याचे उपाय योजूं लागलों. आणि ज्ञानसंपादन करून या हलक्या कुळांतला जन्म आणि दारिद्र या दोन शृंखलांतून मुक्त कसें व्हावें याचे मार्ग शोधूं लागलों. माझ्या अंतःकरणांत चिंबलेली तुझी तेजःपुंज मूर्ति सर्व वैभवाचें स्थानच झाली, आणि ज्या उपायांनीं मनुष्य मनुष्यावर अंमल करितें ते उपाय योजण्याचे मोहांत मला पाडूं लागली. तुझ्याकरितां मी मोठमोठ्या विद्वानांच्या ग्रंथांचा अहोरात्र अभ्यास करूं लागलों. मग जेवढें तुझ्याकरितां करावें तेवढें थोडें असें मला वाटूं लागलें. मी तुजविषयीं विचार करीत असतां मदनानें मला कवनशक्ति दिली; आणि तुझें चित्र काढावयासही शिकविलें. पण त्यांत तुझे सतेज डोळ्यांतलें पाणी कोठून येणार! अखेरीस चित्र तें चित्रच. अशा उद्योगांत मी गुंतलों असतां लोकांनीं मला नादी म्हणावें—कित्येकांनीं तर वेडा म्हटलें,—पण मी त्यांकडे लक्ष दिलें नाहीं आणि तसाच श्रम करीत चाललों; मनांत अधिक अधिक आशा उत्पन्न होऊं लागली. तूं मला प्राप्त झाली नाहींस तरी मी तुझ्या योग्य व्हावें एवढा माझा हेतु होता, आणि त्यामुळें मनाला सुख होत असे.

**मोहना**—याजविषयींचा माझा द्वेष कां बरें नाहींसा झाला?

द्वेष नाहींसा करण्याची याच्याजवळ कांहीं जादू आहे काय?

यशवंतराव—सरशेवटीं एक दिवस तुजविषयींचे माझे विचारांची कविता करून ती तुजकडे पाठवून दिली,—असल्या कविता कितीही हलकटाकडून आल्या तरी सुंदर स्त्रिया त्यांचा अव्हेर बहुतकरून कधीं करीत नाहींत. माझें अंतःकरण विव्हळ होऊन मनाचे नाना तरंगांनीं तुजवर रममाण झालें आहे, हें दाखविण्याकरितां मी आपले नांवाची सही केली. तें नांव पाहून तुला भूषण वाटावें, पण तसें न होतां तूं त्याचा तिरस्कार केलास. तेव्हांपासून माझी वृत्ति बदलली, अंतःकरण अगदीं खवळून गेलें, आणि तुजपासून झालेल्या अपमानाशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट मनांत येईना. या संधीस त्या दुष्टांनीं आपला सूड उगविण्यास हा पुरुष योग्य आहे असें योजून मला गांठलें! तूं सापावर पाय दिलास म्हणूनच तो उलटून तुला चावला!

मोहना—महाराज, प्रीति कधीं दंश करीत नसते! पण या गरीब अबलेनें अपमान केला तो किती, आणि तेवढ्याबद्दल हा केवढा भयंकर सूड उगविला! अरेरे, या माणसाला मी किती भाळलें होतें!—या वेड्याला!—या गुलामाला!

यशवंतराव—पुरे पुरे!—नाहीं, हा गुलाम नाहीं. निराश झालेला मनुष्य दुसऱ्याचाताबेदार नसतो. मला किती खटपट पडली,—काय श्रम झाले,—किती वेळ पश्चात्ताप, दुःख आणि खेद झाला, याविषयीं मी तुला आतां कांहीं सांगत नाहीं. जी गोष्ट झाली ती झाली. आतां माझ्या शक्तिप्रमाणें तुझ्या दुःखाचा जो थोडाबहुत प्रतिकार माझ्या हातून होईल तो मला करूं दे. मोहने!—[ गडिवरून तिचा हात धरायास जातो ]

मोहना—खबरदार! माझ्या अंगाला स्पर्श करूं नका! माझें प्रारब्ध मला कळून आलें आहे. आपण आतां माझे मालक झालां; आणि मी—अरे देवा! माळ्याची बायको! मी खणीन—नांगरीन—झाडांला पाणी घालीन—जें सांगाल तें करीन, पण प्रार्थना इतकीच आहे कीं, या देहाला स्पर्श करूं नका. मला इतकें छळलें याबद्दल माझें एवढें तरी ऐका!

यशवंतराव—भिऊं नको. मोहने, तूं अजून मला पक्कें ओळखिलें नाहींस. बहुल्यावरच सूड घेणें संपलें, आणि मी त्या दुष्ट शपथेंतून मुक्त झालों! यापुढें तुजपेक्षां मला एखादे देवळांतली सिंहासनावर बसलेली मूर्तिही अधिक पवित्र नाहीं. मी तुझा पति—नाहीं पण, आतां तूं त्याविषयीं भिऊं नको; हे पाहा मी आपले पतित्वाचे सर्व हक्क तुझे चरणीं अर्पण करितों. कपटानें झालेलें लग्न आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें पोकळ आणि खोटें मानलें आहे. आतां रात्रभर तूं बिनघोर निद्रा कर. मग प्रातःकाळीं आतां जशी पवित्र कुमारिका आहेस तशी आपल्या पित्या-बरोबर आपल्या घरीं जा. धर्मशास्त्राप्रमाणें तुला आपले आवडीचा पति करण्यास परवानगी मिळेल. जेव्हां तूं थोडी सुखी होशील आणि ज्यानें तुजवर इतकी प्रीति केली आणि तुला इतकें दुःख दिलें हें अर्धें मुर्धें विसरशील, तेव्हां इत-का तरी विचार मनांत आण कीं, त्या माळ्याच्या पोरांत थोडें तरी सौजन्य होतें. आई, (म्हातारी येते.) या स्त्रीला तिकडे ने—ही कांहीं माझी बायको नव्हे; आई, ही आपल्या घरीं कोणी सभ्य पाहुणीच आली आहे असें समज. माझे प्रामाणिक बाबांचे पवित्र घरीं इला निजूं दे, म्हणजे तेथें इच्या निद्रेचा

भंग करण्यास कोणाच्यानें जाववणार नाहीं. हे स्त्रिये, आतां तरी तुझा विश्वास मजवर आहे ना? आई, जा इला घेऊन!

**म्हातारी**– यशवंता! ही तुझी बायको नव्हे!

**यशवंतराव**– पुरे पुरे! कृपा करून बोलूं नको! इला एकदांची घेऊन जा.

(म्हातारी जिना चढते; मोहना रडत रडत तिचे मागून जाते; जातांना मागें वळून पाहते.)

**यशवंतराव**– (खालीं बसून) सकल देवतांनो, इजवर दया करून इचें संरक्षण करा!–

**तिसरा अंक समाप्त.**

## अंक ४—प्रवेश १.

(झोंपडी पूर्ववत्; यशवंतराव सतरंजीवर बसले असून पुढें दऊत रुमाल वगैरे आहेत; सूर्योदयाची वेळ झाली आहे.)

**यशवंतराव**—सरशेवटीं लागली तिला झोंप एकदांची! ही ईश्वराची कृपाच समजायाची. कारण आतां कांहीं वेळपर्यंत तरी तिला माझें स्मरण होणार नाहीं. सर्व रात्रभर तिचे रडण्याचे हुंदके ऐकून माझें काळीज फाटून गेलें—तें थांबलें एकदांचें. आतां जिकडे तिकडे शांत स्वस्थ आहे. आतां मी जातों, आणि तिचे बापास पत्र पाठवून येथें आणितों. तो आल्याबरोबर काडी मोडून देण्याविषयींची माझी कबुलायत त्याचे हातांत एकदम टाकतों, आणि मग मी आपल्या देशाच्या सेवेस लागतों.—हल्लीं महाराष्ट्र देशांत माझ्यासारख्या पुष्कळांचें काम आहे. आणि सांप्रतची स्थिति अशी आहे कीं, जर मी दोनचार लढायांत जय मिळविला, तर माळ्याचा मुलगा असतांही कुलीन सरदारांत गणला जाईन, आणि मोठ्या नांवालौकिकास चढेन.—

(म्हातारी येते.)

**म्हातारी**—बाळा यशवंता, तूं फार अयोग्य वर्तणूक केली! पापाचें प्रायश्चित्त आपोआप मिळत असतें. अस्तु. तुझे दुःखावर डाग देणें मला आईला योग्य नाहीं.

**यशवंतराव**—जें झालें तें झालें. पण ज्यांच्या अंगीं पश्चात्ताप करून प्रायश्चित्त घेण्यापुरता सद्गुण आहे त्यांस पुढील सुवर्तनाचे मार्ग मोकळे आहेत. आई, मी अजून तुला नांव करून दाखवीन. बरें पण, त्या गरीब बिचारीला माझ्यामुळें फारच दुःख झालें आहे; तिची चांगली

बडदास्त ठेव, तिचा मान राख, व तिला चांगल्या रीतीनें वागीव, ह्मणजे माझ्या अंतरात्म्याला समाधान होईल. ती रडूं लागेल तर शांतवन कर, ती रागावली तर मुकाट्यानें ऐकून घे. आतां थोडाच वेळ राहिला आहे. मी घोड्यावरून एक मनुष्य पाठवून तिचे बापास येथें आणवितों. तूं तितका वेळ कायती तिची मर्जी संभाळ. मी हा असाच आलों ह्मण.—

ह्मातारी—याशिवाय तुला आतां दुसरा मार्गच राहिला नाहीं. तुला लोकांनीं फसविलें तरी पण तुझें अंतःकरण कठोर झालें नाहीं. त्यावेळी तें जसें शुद्ध होतें, तसेंच अजून आहे; तूं मोठ्या उमेदीच्या विचारांत असतांही मला गरीब ह्मातारीला आपली आई असें कबूल करण्यास लाजला नाहींस.

यशवंतराव—तुजविषयींची लाज! नाहीं, मी अजूनपर्यंत वांचलों आहें, अजून दुःख सहन करीत आहें, आणि आशा करीत आहें, तें कशाकरितां? तर, मी आपल्या थोर आणि निष्कलंक मातापितरांच्या पोटीं येऊन त्यांच्या नांवाला जो थोडासा कलंक लाविला आहे तो अगदीं निर्मूळ काढून टाकावा ह्मणून; आणि तसें करण्याची अजूनही मला सवड आहे. [जातो.]

ह्मातारी—बाळा यशवंता! तुजकरितां माझें अंतःकरण किती बरें हळहळत आहे!!

[मोहना माडीवरून खालीं पाहाते आणि कांहीं वेळ थांबून खालीं उतरते.]

मोहना—येथें नाहींत!—येथें असून मला होणारें दुःख तरी निदान ते चुकवीत आहेत, यावरून ते विचारी दिसतात; पण ते येथें नसल्यानें तर हें घर मला अधिक

ओसाड दिसतें. अरेरे! माझ्या मनांत त्या माळ्याच्या पुत्राविषयीं द्वेष उत्पन्न होईल तर किती बरें होईल! तरी किती सभ्यपणानें–छे! छे! मी इतकी हलकट नाहीं कीं त्यांना क्षमा करीन.

म्हातारी–बाई, उठलां का आपण! आपण जाग्या झालां असें मला समजतें तर मी आपले सेवेंत हजर झालें असतें.

मोहना–तसें नाहीं. बाई, तुमच्या मुलाच्या बायकोनें आपली सेवा आपणच केली पाहिजे.

म्हातारी–माझ्या मुलाची बायको! हें मनांत आणून खेद करूं नका बाई.–त्यानें मला सांगितलें कीं, तो तुह्माला काडी मोडून देणार आहे, आणि मला अशी आशा आहे कीं, असें झाल्यावर मी त्याचा चेहरा पुनः एकदां प्रफुल्लित पाहीन. या आमचे खेड्यांत पुष्कळ सुरूप आणि तरूण मुली आहेत, त्यांपैकीं कोणी तरी त्याला सुख देईल.

मोहना–त्याला कोण नको ह्मणतें आहे? काडी मोडून दिल्यावर तसें होईल, ही माझी खात्री आहे. [रडते.]

म्हातारी–त्याची मर्जी असती तर या प्रांतांतील मोठ्या श्रीमंताच्या मुलीशीं त्याचें लग्न झालें असतें. पण करूं काय! त्याचे डोक्यांत जें काय वेड भरलें तें तुझे-शिवाय दुसरी कोणतीही गोष्ट मनांत आणी ना! [रडते.]

मोहना–सासूबाई, हें काय असें, रडूं नका.

म्हातारी–त्यानें हें फार अविचाराचें आणि वाईट काम केलें हें मी समजतें, पण तारूण्य हें मनुष्याला फार वेडें करून सोडतें. बाई, आतां रडूं नका.

मोहना–बरें, तुह्मी काय ह्मणत होतां? चालूं द्या.–

ह्मातारी-बाई, माझ्या मुलानें मोठा अन्याय केला तो मला पोटांत घालतां येत नाहीं–खचीत तो शुद्धीवर नव्हता तेव्हां.

मोहना–पण त्यांचें नेहमीं-नेहमीं [हुंदका आणून] मजवर प्रेम होतें ना?

ह्मातारी–हें काय विचारतां! तुमच्याशिवाय त्याचे ध्यानींमनीं दुसरें कांहीं एक नव्हतें. हें पाहा, तुमची तसबीर काढतां यावी ह्मणून तो चित्रें काढावयास शिकला. (पडदा वर करून तसबीर दाखविते.) पण तें आतां सर्व संपलें. तुह्मीं त्याला बराच शुद्धीवर आणला आहे–बरें पण, तुह्मीं अजून कांहीं खाल्लें नाहीं?

मोहना–नाहीं, मला भूकच नाहीं. तुह्मी उगीच खटपटींत पडूं नका.

ह्मातारी–नाहीं बाई, माझें ऐका. थोडेंसें दूध घ्या ह्मणजे तुह्माला बरें वाटेल; मी यशवंताचा रुप्याचा पेला काढल्यें. तीन वर्षांपूर्वी त्यानें तो आपल्या सांचिवलेल्या पैशांतून करवून त्यावर ‘मोहना’ हें नांव कोरविलें आहे.

मोहना– काय, तीन वर्षांपूर्वी!–तुह्मी इतकें ह्मणतां त्यापेक्षां घेतें थोडेंसें दूध. अरेरे, जर कां हा गरीब गृहस्थ किंवा साधारण व्यापारी असता तरी चालतें–पण माळ्याचा मुलगा!–आणखी काय हें घर!–नको नको–ती आठवणही नको! [त्या दोघीही खालीं बसतात. दौलतराव जाळींतून डोकावतो.]

दौलतराव– ठीक, ठीक. आतां एथें दुसरें कोणी नाहीं!

यशवंतराव तर मला रस्त्यांत भेटला; आतां चांगली संधी आहे. [ जाळी लावून दोराशीं जाऊन तें ठोकतो. ]

**मोहना**—[ एकदम उठून ] काय, बाबा तर नसतील?—पण त्यांना अजून बोलावूं पाठविलें नाहीं. मला घालवून देण्याविषयीं त्यांच्यानें इतकी घाई करवणार नाहीं.

**म्हातारी**—इतक्यांत कसा तुमचा बाप येईल बाई? हें कोणी शेजारीपाजारी असेल.

**मोहना**—कोणालाही आंत घेऊं नका.

[ म्हातारी दार उघडते. दौलतराव तिला एकीकडे लोटून देऊन आंत शिरतो. ]

देवा देवा!—हा दुष्ट दौलतराव!—खरोखर हा दुःखावर आणखी एक डाग!

**दौलतराव**—कां, कसें काय आहे! म्हातारे, तुला यशवंतरावानें गांवांत बोलाविलें आहे; त्याला कांहीं तुझ्याशीं बोलावयाचें आहे. तो तुला धर्मशाळेजवळ किंवा वाण्याच्या दुकानीं, किंवा गवळ्याच्या घरीं, किंवा दुसरे एखादे तुमचे मित्राच्या येथें सांपडेल. जा लवकर कशी.

**मोहना**—सासूबाई, मला सोडून जाऊं नका! खचीतच जाऊं नका.—

**दौलतराव**—[ मोठ्या नम्रतेनें ] भिऊं नका बाई! मी एक तुमचा हितचिंतक आहें सेवक आहें असें समजा.

**मोहना**—या घरांत आहें तरी मी तुह्माला भितें असें नाहीं—जा तुम्ही बाई. जर तुमचे चिरंजिवांची इच्छा असेल तर—त्यांच्या आज्ञेचे आड न येतां ती मी मान्य करावी असा त्यांचा मजवर हक्क आहे तोंपर्यंत तरी ती मी अमान्य करणार नाहीं.

**म्हातारी**—मला हें कांहीं समजत नाहीं. मी जातें, पण फार वेळ लावणार नाहीं. [जाते]

**मोहना**—तुम्ही येथें कोणत्या उद्देशानें आलां आहां हें मी समजलें. तुमची जिनें फजीती केली तिचे दुःखावर डाग देऊन त्यांत आनंद मानण्याची तुमची इच्छा आहे. बरें कांहीं चिंता नाहीं. आतां मी सर्व दुःखें सोसण्यास सिद्ध आहें,—तुमचे सान्निध्याचें दुःख देखील मी सहन करतें.

**दौलतराव**—मोहने, तूं माझा हेतु समजली नाहींस,—मी तुझ्या पायांवर आपलें सर्व ऐश्वर्य अर्पण करण्याच्या हेतूनें आलों आहें. त्या ठकाची तुजवरील भुरळ आतां नाहींशी झालीच असेल. या तुझे सौंदर्यास हें घर शोभत नाहीं! आतां या तुझे सुकुमार आणि नाजूक देहाचें त्या माळ्याच्या पोरानें आलिंगन घ्यावें ना? प्रिये! सुंदरी! मोहने! चल मजबरोबर—माझा रथ बाहेर उभा आहे. तुजसारख्या रत्नाला योग्य अशा ठिकाणीं मी तुला नेईन. संपत्ति आणि घर हीं सर्व तुझींच होतील. तूं माझा धिःकार केला तो आतां माझ्या मनांत राहिला नाहीं—आतां फक्त तुझें हें सुंदर रूप आणि माझी त्यावरली अनिवार्य प्रीति यांचें-च कायतें स्मरण आहे.

**मोहना**—तुम्ही एथून निघून जा. हें कसेंही असलें तरी पतीचें घर आहे, म्हणून तें शास्त्रदृष्टीनें आणि मानवी दृष्टीनें माझ्या अब्रूचें संरक्षक आहे: ज्यानें राजाचें सोंग घेऊन मशीं दगलबाजी केली, त्याबरोबर, खायाला न मिळालें तर मी उपास करून मरेन; पण आपण प्रत्यक्ष ते राजे असलां तरी आपणाला वरणार नाहीं, ही खात्री ठेवा. चला!—व्हा एथून चालते कसे.

दौलतराव—कां, अद्यापि तुझा गर्व उतरला नाहीं वाटतें?

मोहना—ज्याला भरभराटींत गर्व म्हणतात तो संकटावस्थेंत सद्गुण होतो.

दौलतराव—एकदां सभोंवतीं तर पाहा! या भिंती काय! ही जमीन काय! जिकडे पाहावें तिकडे अठरा विश्वे दारिद्र्य आहे! याचा विचार कर, आणि करवीरांतील मजसारखा पहिल्या प्रतीचा श्रीमान गृहस्थ तुजसारख्या अत्यंत रूपवतीला आपली संपत्ति आणि सर्व वैभव अर्पण करीत आहे हें मनांत आण ऐक माझें!

मोहना—बाबा, कां बरें मी आपणाला सोडलें! कां बरें मी अनाथ पडलें! अहो, मी एक फसलेली, गांजलेली, दीन, अनाथ, अबला आहें.—माझें दुःख पाहून तरी उगे राहा. [यशवंतराव हळूच दार उघडून उंबऱ्याशीं उभा राहतो.]

दौलतराव—नाहीं, मी त्या दुःखाचें शांतवन करितों. मला एकदां तुझ्या अधराचें—तो तुझा पति हलकट माळी त्याला तें योग्य नाहीं. [तोंड पुढें करून येतो.]

मोहना—धांवा! धांवा! यशवंतराव!—अरेरे, मला आतां कोणीच त्राता नाहीं काय?

दौलतराव—गप्प राहा! [जंब्या दाखवून] पाहा, मी बलात्कार करण्याचे देखील तयारीनें आलों आहें. मी तुजकरितां तुझे नवऱ्याचा आणि त्याच्या सर्व घराचा समाचार घेऊन टाकीन. हा पहा मी तुला धरितों.

यशवंतराव—[त्यास एका बाजूस ढकलून देऊन] मोहने—वर पाहा, भिऊं नकोस.

दौलतराव—[जंब्या त्याजकडे करून] हे हरामखोरा! मजसारख्या थोराचा तूं अपमान करितोस काय?

मोहना– सोडा, जाऊंद्या त्यांना ! माझ्या पतीला जीवदान द्या ! दौलतराव ! यशवंतराव–नका–नका–[ मूर्च्छा येऊन पडते. ]

यशवंतराव– हे हलकटा, कुरापत काढणाऱ्या गुलामा ! थुः तुझ्या तोंडावर ! बायकांना भिवविण्याकरितां काय रे हा शौर्याचा आव? हा धंदा ! तुझे हातापायांना तर कंप सुटला आहे.–तुझें शस्त्र तर निर्फळ हें तुला माहीतच आहे–तुझ्या अंगीं बहुरूपाचें धैर्य आहे, पण शूराचें नाहीं–मोहने, कांहीं भिऊं नको, याच्यानें काय व्हायाचें आहे ?

दौलतराव– तूं एखादा गृहस्थ तरी असतास तर बरें होतें. पण तूं आहेस तो मजपेक्षां फार कमी आहेस–बरें राम राम ! मारा आतां ऐहिक सुखाच्या मौजा ! [ एकीकडे ] मी याचा सूड उगविल्यावांचून मरणार नाहीं ! [ जातो. ]

यशवंतराव– इला आतां मी कवटाळून धरलें आहे–हें शेवटलें आलिंगन ! अरेरे ! नाहीं, आतां पुनः नाहींना हें शिर ह्या हृदयावर टेंकून विश्रांति घेणार ! माझ्या अंतःकरणानें तिला आश्रय देऊन संभाळायाचें तसें न करितां तिचा विश्वासघात केला !–बरें असो–एक मुका तर–गरीब बिचारी ! आतां हें इचें निस्तेज वदन तिरस्कारानें मला नको ह्मणत नाहीं ! एक मुका घेतों, ह्मणजे माझ्या सर्व अपराधांची समाप्ति होइल–आणि आशेचें द्वार बंद होऊन तिचें स्मरण सदोदित मनांत बागवून बसेन;–अरे ! ही श्वासोच्छ्वास टाकते–हीं हालते–आतां सावध झाली ह्मणजे ही माझा तिरस्कार करील, द्वेष करील, पण मी प्रीतीनें स्पर्श

केला ह्मणून मला झिटकारणार नाहीं–[ तिला नीट बसवितो ], झालें, आतां आपण परके आहों !

मोहना– सर्व गेले–जिकडेतिकडे शांतता झाली–सर्वेच स्वप्न कीं काय ? तुह्मी सुरक्षित आहां ना ? लागलें-सवरलें नाहीं ना ?–तुमच्यावर माझी प्रीति तर नाहींच–पण पडलें बायको–बरें, रक्तपात तर नाहींना झाला ?

यशवंतराव– नाहीं, तसें कांहीं झालें नाहीं. तुझ्या प्रीत्यर्थ कचाट्यांत सांपडून माझा जीव जावा इतकें कोठचें माझें भाग्य !

[ ह्मातारी येते. ]

ह्मातारी–बाळा, मीं तुला गांवभर धुंडलें. तूं होतास तरी कोठें ? कशाला मला बोलाविलें होतेंस ?

यशवंतराव–मी नाहीं तुला कधीं बोलावूं पाठविलें.

ह्मातारी–नाहीं ! बरें पण, तूं तिकडे पाठविलेला मनुष्य परत आला.

यशवंतराव–इतके लवकर ! असें होणार नाहीं !

ह्मातारी–होय खचीतच आला; या बाईचे आईबाप त्यास वाटेंतच भेटले; ते कोणाच्या भेटीकरितां चालले होते. तुझें पत्र पाहातांच देवराव संतापानें अगदीं लाल झाले–असें तो मनुष्य ह्मणतो. ते आतां इतक्यांत एथें येतील. अरे यशवंता ! ते येथें आल्यावर तुझी काय अवस्था होईल ? मला तर कांपरी भरली आहे ! अहो बाई ! याला इजा होऊं देऊं नका–हा तुह्मांवर किती प्रीति करीत होता हें जर तुह्माला माहीत असतें तर.

मोहना–यांना इजा ! त्याविषयीं तुह्मी भिऊं नका बाई;–बाबा येतात ! मी त्यांना कोणत्या तोंडानें भेटूं

आणि त्यांबरोबर पुनः कशी करवीरांत जाऊं? तेथील सर्व लोक माझी फजीती करतील. दुष्ट कोठचे! [फार संतापून] प्राणनाथ--अहो, आपण मशी मोठीच दगलबाजी केली.

यशवंतराव– होय, केली खरी.

मोहना–[एकीकडे] फक्त त्यानें माझी क्षमा मागितली कीं पुरे!-मी आपणाला कधींही क्षमा करणार नाहीं–

यशवंतराव–तीं कराल अशी मी कधींच आशा केली नाहीं.

मोहना–पण आतां आपण माझे पति आहां, आणि मी आपणाशीं शपथ वाहून चुकलें आहें.

यशवंतराव–पण तें सर्व खोट्या समजुतीमुळें झालें. धर्मशास्त्राप्रमाणें तूं त्या शपथेपासून मोकळी होशील.

मोहना–अशानें मला वेड लागेल! जर हे थोडे कमी अभिमानी असते,-जर मला राहा म्हणून सांगतील-अरे पण ही गाडीची चाकें वाजतात-हे आले! आतां वेळ चालली, कांहीं बोलावयाचें आहे का? बोला लवकर.

यशवंतराव-तूं एकदां या यातनेंतून सुटलीस म्हणून मला आनंद झाला आहे, हे पाहा तुझे आईबाप आले!

[देवराव, आनंदीबाई, आणि गंभीरराव येतात.]

देवराव–मुली!–मोहने!–

आनंदीबाई–कायग बिचारे मोहने ही तुझी अवस्था! काय मेलें हें भिकार घर तरी! ए थेरडे, मला बसावयास पाट तरी दे. मला तर बाई घेरी येऊं लागली–आलीच पहा. आतां लोक काय म्हणतील? पोरी, तूं अगदीं

फसलीसगं फसलीस! (बसते.) आईचें हृदय कसें सहज फाटतें पहा!

गंभीरराव—हा! हा! महाराज, आपल्यासारख्या मोठ्या पुरुषांस या अवस्थेंत पाहून मला फार वाईट वाटतें. बहुधा खाविंदांस आतां कारागृहांत वस्ती करण्याचा प्रसंग येईलसें वाटतें.

यशवंतराव—बोला आतां हवें तितकें खोंचून; तुह्मी शस्त्ररहित होतां तेव्हां मी तुह्मास सोडलें-आतां मी शस्त्ररहित आहें. कारण ज्याच्या अपराधास कांहीं सबब नाहीं तो खरोखरीच निःशस्त्र असें ह्मटलें पाहिजे.

गंभीरराव—कसेंही ह्मणा, पण गुलामामध्यें कांहीं पाणी आहे खरें!

देवराव—कोठें आहे तो ठक? तूंच का तो निर्लज्ज दगलबाज? या पोरीचे बापापुढें उभें राहण्यास तुला कांहीं भीति वाटत नाहीं?

यशवंतराव—आपण तिचे तात आहां—मर्जी असेल तर मारा मला.

मोहिना—बाबा! बाबा! मजकडे पाहा;-त्यांचा अपराध कसाही असो, पण ते मजशीं फारच योग्य रीतीनें वागले.

आनंदीबाई—योग्य रीतीनें! काय पोरी, तूं वेडी तर नाहींसना? चल निघ—आपल्या सर्व कुळाला बट्टा लावलास! योग्य रीतीनें! [दांत ओंठ खाऊन] अरे दुष्टा, निर्लज्जा, कार्ट्या, अधमा,—माझ्या पोरीला नाडलीसरे विद्या!

गंभीरराव—विद्या का? काल तर तो मदनाचा पुतळा होता!

**मोहना**—आई, हें त्यांचें घर आहे, आणि ते माझे पति आहेत. तुला काय बोलायाचें असेल तें मला बोल.

**आनंदीबाई**—तूं—तूं—अरेरे, माझा जीव घाबरा होतो!

**देवराव**—अहो, आपल्यासारख्याच्या निर्दय अंतःकरणावर शिव्यांची वृष्टि केली तरी निष्फळ आहे—तुह्मी माझ्या पोरीवरील सर्व हक्कांची सोडचिटी करून देतां ना?

**यशवंतराव**—होय, देतों. [ एक कागद देतो ] ही घ्या माझी लेखी संमति. हींत मी आपली दगलबाजी कबूल करून झालेला विवाहसंबंध खुशीनें तोडून टाकला आहे. आपले कन्येची लबाडीनें छळणा झाली ही गोष्ट खरी. पण या दाराच्या आंत तिनें पाऊल ठेवल्यापासून मी तिची योग्यता ठेवून आपल्या पायरीनें वागलों किंवा कसें, याविषयीं तीच आपली खात्री करील. काल प्रातःकाळीं आपल्या पायांवर डोकें ठेवून आशीर्वाद घेतांना ती जशी पवित्र आणि निष्कलंक होती, तशीच आतां मी तिजला आपल्या स्वाधीन करितों. मी तर आपणास पुनः कधींही हें तोंड दाखविणार नाहीं. एखाद्या ज्ञातिभ्रष्टाप्रमाणें किंवा गुन्हेगाराप्रमाणें देशांतरास जाऊन तेथें, झालेल्या पातकाची क्षमा आणि आपल्या कन्येचें कल्याण होण्याविषयीं मी देवाची प्रार्थना करीत बसतों. येतों आतां—राम राम!—हा आतां मीं सर्वांचा शेवटचा निरोप घेतों.

**म्हातारी**—यशवंता,—यशवंता,—अरे बा, या आपल्या गरीब बिचारे म्हातारीला सोडून जाऊं नको. तिनें कांहीं तुला दुःखाच्या वेळेस नाकबूल केलें नाहींना! मायलेंकांचा कोणत्याही कारणानें वियोग होऊं नये. [ त्याला पोटाशीं धरते. ]

**मोहना**—ही बिचारी म्हातारी मला माझा धर्म शिकविते. आई!—तुम्ही आतां मलाही आईच्या ठिकाणीं आहां—तुम्ही म्हणतां त्याप्रमाणेंच मला वाटतें कीं, कोणत्याही शास्त्राच्या आधारानें पतीच्या दुःखापासून स्त्री वेगळी होत नाहीं. प्राणनाथ—प्राणनाथ—मी सर्व विसरलें—सर्व गोष्टींची क्षमा झाली—मी आतां सर्वस्वीं आपली आहें.

**आनंदीबाई**—काय बोलतेस हें?—चल, हो बाहेर मजबरोबर, नाहींपेक्षां मला पुनः तोंड नको दाखवूं.

**देवराव**—मोहने, आम्ही तुझ्याशीं कधीं दगलबाजी केली नाहीं, असें असून त्या दगलबाजाचे पायीं तूं आम्हाला सोडतेस?

**मोहना**—(बापाजवळ जाऊन) बाबा, तुम्हीं त्यांना क्षमा करा; आपण सर्व एकत्र राहूं; ते आपल्यास पुत्राच्या ठिकाणीं होतील.

**देवराव**—असें कधीं घडणार नाहीं—तूं आम्हांस सोड, आणि आपली त्याला घेऊन बस! त्याचें घर तें तुझें,—त्याचें द्रव्य तें तुझें,—व त्याचें नशीब तें तुझें. मी जी संपत्ति मोठ्या कष्टानें मिळविली आहे ती त्या सारख्या दगलबाजास श्रीमंत करण्याकरितां नाहीं—

**मोहना**—तर मग तुमच्या मनांत असें आहे वाटतें, कीं बायकोनें श्रीमंती भोगावी आणि पतीनें काबाड-कष्ट करावे!—प्राणनाथ, मी आपणाबरोबर येतें. आपण मला धन दौलत, मोठेपणा इत्यादि दिलें नाहीं, तरी खरी अंतःकरणपूर्वक प्रीति दिली आहे. तिजकरितां मी आपल्याबरोबर जें दुःख भोगावें लागेल तें भोगीन,

आणि झाल्या गोष्टीविषयीं या तोंडावाटे एकही अवाक्षर काढणार नाहीं.

यशवंतराव—सर्वांत हे शब्द तर फारच टोंचतात.—मी कसलें अंतःकरण इतकें दुखाविलें हें! महाराज, आपण कांहीं काळजी करूं नका, मी केवळ पाषाणहृदयी आहें असें नाहीं.—माझ्यापेक्षां अधिक पवित्र प्रीति कोणी पुढें ईश्वर करील, तर तिचें मी हरण करणार नाहीं मोहने, तूं दयेचें आणि प्रीतीचें मंदिर आहेस. तुझ्या स्मरणेंकरून मला सद्गुणांविषयीं आस्था उत्पन्न होते. अशा या लावण्ययुक्त आणि थोर स्त्रीरत्नाचा पति नीच कुळांतला आणि मूळचा दरिद्री असला तरी चिंता नाहीं,—कारण देवानें हलक्या कुळांत निर्माण केलें यांत मनुष्याचा अपराध नाहीं,—पण तो असा असावा कीं, त्याला तुजकडे निष्कलंक मुद्रेनें पाहातां यावें, तुझे प्रीतीमुळें त्याला खेद वाटूं नये, आणि तुला कवटाळून धरून "या हृदयांत दगलबाजी नाहीं" असें त्याला ह्मणतां यावें! मी तसा मनुष्य नाहीं!

गंभीरराव—[एकीकडे यशवंतरावाशीं] कसेंही असो, तूं फार योग्य पुरुष आहेस आणि उत्तम समशेरबहादूर होशील. तूं आमच्या फौजेंत राहा. मला काल च पुण्याहून पत्र आलें, त्यांत लिहिलें आहे कीं, सेनापति जोधपुरावर मोहीम करणार आणि फौज घेऊन शिंदळाचे घांटांत मला त्यास गांठलें पाहिजे. मी तिकडे जाण्यास आजच निघणार आहें. तुझी मर्जी असल्यास तूं मजबरोबर चल.

यशवंतराव—तुमच्याजवळ मला मागणें मागायाचें होतें तें हेंच. मला भयंकर शत्रूचे अंगावर जाण्यास सांगा, किंवा दुसरें कोणतेंही जिवावरचें काम असेल तें सांगा!

गंभीरराव—ज्या ठिकाणीं मोठा धोका असेल तेथें तुम्हांस ठेवूं.

यशवंतराव—हा मी हातावर हात देतों! आई, तूं आपला वरदहस्त माझ्या डोक्यावर ठेव. मी आपले बाहुबळानें मोठमोठे जय मिळवून राजपुत्रापेक्षांही अधिक योग्यता मिळवीन आणि नंतर तुला तोंड दाखविण्यास येईन. [मोहनकडे वळून] आणि तूं—मजवर अनिवार्य प्रीति केली आणि मी तुझा विश्वासघात केला!—अस्तु, अजून कांहीं झालें नाहीं कारण तुझें स्मरण तरी मला जन्मभर राहील. ज्यावर तूं प्रीति केलीस तो मी जर जगलों वांचलों तर नांव गाजविल्यावांचून राहणार नाहीं, आणि कदाचित् लढाईच्या गर्दीत पडलों तर मरतेवेळीं तुझेंच स्मरण करीन. मला आणखी तुझ्याशीं बोलावें-प्रार्थना करून आशीर्वाद मागायाचा-पण नको—माझ्या अंगीं योग्यता येईल तेव्हां मी तो देवापाशींच मागेन. आतां [देवरावाकडे वळून] महाराज, क्षमा असावी—हे माझे शेवटले शब्द आहेत रामराम!

गंभीरराव—मीही याचेमागून जातों—याला आणल्याबद्दल सेनापति मला शाबासकी देतील.

मोहना—[बागेचे हातांतून निघून जाऊन] प्राणनाथ! प्राणनाथ!—[मूर्च्छित होते.]

चवथा अंक समाप्त.

# अंक ५.–प्रवेश १.

चवथ्या अंकाच्या काळानंतर अडीच वर्षांनीं.

[ करवीरांतील रस्ता. पहिला, दुसरा, आणि तिसरा अंमलदार. ].

**पहिला अंमलदार** आज आपण सरदार बहादर गंभीरराव यांचे गांवीं आलों आहों.

**दुसरा अंमलदार**–येथून गेल्यावर त्यांनीं एक मोठा हुद्दा मिळविला आहे. या करवीरांतील लोकांस गंभीररावाचा अभिमान असला पाहिजे.

**तिसरा अंमलदार**–मराठ्याचे सैन्यांत बढती तेव्हांच मिळते. हे मुराररावच पहा–कुठले, कोण, काय याचा पत्ता नाहीं. पण जोधपूर सर केल्यामुळें त्यांनीं सरलष्करची कृपा संपादिली, आणि सगळे अडीच वर्षांत सुभेदारीच्या हुद्यावर चढले.

[ सरसुभेदार गंभीरराव येतात. ]

**गंभीरराव**–रामराम–रामराम–आपलें येथें दोन दिवस राहणें होणार आहे, तेवढ्यांत तुह्मी चांगली मौज माराल अशी मला उमेद आहे. करवीर हें टुमदार शहर आहे. मी येथून गेल्यापासून हें पुष्कळच सुधारलेंसें दिसतें. ज्या कालगतीनें आपण वृद्ध होतों तिच्याच योगानें जेव्हां आपला स्वदेश उदयास येतो तेव्हां वृद्ध होणें हें खरोखरी सुख आहे, असें वाटतें. तुम्हांला मुरारराव नाहीं भेटले वाटतें ?

**प० अं०**–नाहीं. आम्ही त्यांविषयींच बोलत होतों.

**दु० अं०**–सुभेदार साहेब, हे मुरारराव कोण आहेत हें आम्हांस कळेल काय ?

गंभीरराव—कोण ह्मणजे, ते मराठ्याचे सैन्यांतलि एक सुभेदार आहेत,

तिं० अ०—तें खरें, पण ते पूर्वी कोण होते?

गंभीरराव—पूर्वी? मला वाटतें, पाळण्यांत लोळणारें लेंकरूं होते.

प० अ०—हा! हा! सुभेदार साहेबांची आपली नेहमींच थट्टा!

दु० अ०—[तिसऱ्या अमलदारास एकीकडे] ही गोष्ट सरसुभेदारांस कधीं आवडत नाहीं, अशानें त्यांस राग मात्र येईल.—सुभेदार साहेब, कांहीं हुकूम?

गंभीरराव—कांहीं नाहीं. रामराम—[दुसरा आणि तिसरा अंमलदार हे जातात.]

गंभीरराव—आमची मंडळी फार विचक्षण आहे. गरीब बिचारा मुरारराव!—त्याची ज्याला त्याला चौकशी.

प०अ०—चौकशी नाहीं—कळकळ ह्मटलें तर शोभेल. याचें कारण, त्यांचें तें औदासीन्य,—एकलकोंडेपणा,—धाडस,—सैन्यांतील त्यांची मोठी बढती,—आपली मैत्री, आणि त्यांच्या वरील सरलष्करची कृपा इत्यादि गोष्टींमुळें, आह्मांला त्यांच्या गोष्टी सांगण्यास आणि त्यांची वाखाणणी करण्यास ते एक स्थानच झाले आहेत. पण महाराज, ते आहेत कोठें? सकाळपासून मला ते कोठें दिसले नाहींत.

गंभीरराव—मी त्यांविषयीं तुह्मांला एक गुप्त गोष्ट सांगतों. तो माझा तरुण मित्र या करवीरांत एक अद्भुत चमत्कार दृष्टीस पडेल या आशेनें आला आहे.

प० अ०—अद्भुत चमत्कार!!

गंभीरराव–होय, अद्भुत चमत्कार!–ह्मणजे एक एकनिष्ठ स्त्री.

प० अ०–हं–प्रेमाची कांहीं गोष्ट आहेसें वाटतें.

गंभीरराव–होय, तसेंच. त्यानें या करवीरांत पाऊल टाकल्याबरोबर मला हातानें खूण करून, घोड्यावरून खालीं उडी टाकली, आणि आतां तो मला वाटतें, जो भेटेल त्यास विचारीत फिरत आहे, कीं अमूक स्त्री अमूक पुरुषाला अजून स्मरत आहे कीं नाहीं?

प० अ०–ते यशवंत होवोत! आणि त्यांला यश येईल यांत संशय नाहीं. मुराररावांनीं जर आज करवीरांतील कोणत्याही गर्विष्ट घराण्यांतील मुलगी मागितली तरी तें त्यांस शोभेल.

गंभीरराव गर्व हा गुण आहे असें मानलें तर ती स्त्री आणि तिची आई या दोघीही पूर्णपणें संपन्न आहेत बरें. आतां मुरारराव तुह्मांस भेटले तर त्यांना सांगा कीं, मी अंबाबाईच्या देवळांत आहें.

प० अ०–जी, सुभेदार साहेब! [ निघून जातो. ]

गंभीरराव–आतां मी देवराव्याकडे जाईन आणि तेथील बातमी माझ्या स्नेही सरदारास कळवीन. अरे पण!–हा दौलतराव इकडे येत आहे!

[ दौलतराव येतो. ]

रामराम दौलतराव, कसें काय चाललें आहे?

दौलतराव–[ एकीकडे ] गंभीरराव! गोष्ट फार वाईट झाली;–जोधपूरच्या स्वारींत त्यांस पुष्कळ लूट सांपडली असली तर ते माझा बेत अगदीं आयत्या वेळेस मोडतील. [ मोठ्यानें ] आपला दास आहें सरसुभेदारसाहेब!–मला वा-

टतें, आपला नवीन हुद्दा हाच आहे. येथें आतांच स्वारी आली वाटतें? "

गंभीरराव–अजून एक तास झाला नाहीं. बरें, देवरावा-कडचें कसें काय चाललें आहे? त्या यशवंतरावाच्या प्रकरणांत त्यांनीं तुह्मांला क्षमा केली का? त्या लुच्चेगिरींत तुमचें आंग होतें, नाहीं बरें?

दौलतराव–पण तुह्मी समजतां इतकें नव्हतें. त्या लुच्चानें मलाच ठकाविलें! आतां मीं सगळें जिकडल्या तिकडे नीट केलें आहे. बरें, तो आतां कोठें आहे? तो फौजेंत तर सामील झाला नाहींच, कारण कीं त्याचें नांव कोठें लष्करी पटांत आढळत नाहीं.

गंभीरराव–मला यशवंतरावाविषयीं कांहीं कळलें नाहीं. तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणेंच मी लष्करांत त्याचें नांव ऐकि-लें नाहीं.

दौलतराव–ही गोष्ट बरीच आहे! सुभेदार साहेब, आ-पण लग्न नाहीं केलें वाटतें?

गंभीरराव–कां राव, मी लग्न झाल्यासारखा दिसतों का? देवदयेनें अजून तसें कांहीं नाहीं झालें!–माझा धंदा विधवा करण्याचा, पत्नी करण्याचा नाहीं.

दौलतराव–तुह्मांस लढायींत लूट वगैरे पुष्कळ मिळाली असेल, नाहीं बरें? आणि त्या सर्वांची वारस मोहनाच होणार?

गंभीरराव–लूट! कांहीं नाहीं. वारस कसची! मजजव-ळ सामानाच्या दोन पेट्या, कपड्यांचा एक बुरडी पेटारा, चार घोडे, तीन तलवारी, लष्करी तऱ्हेचे दोन पोशाग, आणि चार चरमी जोडे इतकी कायती जिनगी आहे. एवढी दौलत मोहनेसारखेला खूप होईल खचित!

दौलतराव–( एकीकडे ) याची तर कांहीं धास्ती नाहीं! [ मोठ्यानें ] सुभेदारसाहेब, हेंच का काय तें आपलें भांडवल! मला वाटलें होतें कीं, तुह्मां शिपाई लोकांस येंदां ही दुबळी सांपडली असेल.

गंभीरराव–उगीच सगळी आफवा. दुसऱ्या सरदारां-प्रमाणें माझा लाग साधला नाहीं. आमचा मित्र मुरारराव यानें बरीच पुंजी केली आहे. आमचे सरलष्करांचीही त्या-जवर कृपादृष्टि होती. खेरीज तो स्वत: आह्मां इतर शि-पायांसारखा नाहीं. आह्माला आपले जिवाची खातर नाहीं तशी पैशाचीही नाहीं,-तो पाण्यासारखा उधळून टाकतो.

दौलतराव–बरें, पैसा कांहीं नसला तरी चिंता नाहीं. मोहनेबरोबर मला पैसा मिळावा अशी माझी इच्छाच नाहीं. सुभेदार साहेब, सरशेवटीं आपल्या भाचीनें माझी मागणी कबूल केली हें आपणाला कळलेंच असेल.

गंभीरराव तुमची मागणी! तिचें लग्न तर कधींच झालें आहे!–आणि सोडचिठी कांहीं अद्यापि झाली नाहीं!

दौलतराव तें खरें. पण आजच्या आजच नारळ सा-खर वांटली जाऊन करार व्हायाचा आहे, कीं काडी मोडल्यापासून आठ दिवसांचे आंत तिचें माझ्याशीं लग्न लागून ती माझे स्वाधीन व्हायाची. या करारावर सर्वांच्या सह्या व्हावयाच्या आहेत.

गंभीरराव तुह्मी मला एक नवलच सांगत आहां! पण नवल कसचें! बायकांचा कांहीं भरंवसा नाहीं!

दौलतराव–आतां मी आपली रजा घेतों.

[ तो जात आहे. इतक्यांत देवराव येतात. ]

देवराव–अहो दौलतराव, आपली गांठ पडली, बरें

झालें. चला आपण तो कागद घेऊन कचेरींत जाऊं.

**गंभीरराव**–[ देवरावास ] कां? कसला कागद घेऊन जातां?

**देवराव**– कोण गंभीरराव! आपण आलां कां! फार चांगलें झालें. घरीं चला लवकर, ह्मणजे तिला आनंद होईल.

**गंभीरराव**–तिचें देव-बरें करो. बरें पण [ त्यास एकीकडे नेऊन ] मी आज ऐकिलें हें काय? आपले मोहनेचा पूर्वींचा लग्नसंबंध तोडून टाकून तिचा विवाह दौलतरावाबरोबर होणार, ही गोष्ट खरी का?

**देवराव**- होय, खरोखर. निश्चय देखील होऊन चुकला आहे. आपलें त्याविषयीं काय ह्मणणें आहे? दौलतरावांचें कुळशीळ चांगलें असून ते मोठे श्रीमान् आहेत. आतां आमचा पूर्वींचा डौल आणि अभिमान राहिला नाहीं. बडे लोक आणि राजपुत्र जांवई असावे असें वाटत असे, पण तिची देखील ती सर्व हौस आतां पुरी झाली.

**गंभीरराव**–पण मोहनेची त्या गृहस्थावर फारच प्रीति जडली होती!

**देवराव**–[ तसवीर ओढीत ] त्या गोष्टीला अडीच वर्षें होऊन गेलीं!

**गंभीरराव**–ती गोष्ट खरी. गरीब बिचारा यशवंतराव!

**देवराव**–त्या दगलबाजाचें नांव सुद्धां मजपुढें काढूं नका. मला वाटतें कीं, तो मेला असावा किंवा कोठें काळें करून गेला असावा. तसें कशाला, जरी तो आतां एथें असता, तरी मोहनेला तिचे योग्यतेप्रमाणें शरीरसंबंध झाल्यामुळें ती आपलीं स्वतःचीं दुःखें आणि त्याचे अपराध विसरेल, ह्मणून त्याला आनंदच वाटला असता.

गंभीरराव—तसें नव्हे, जर आपला सर्व प्रकारें निश्चय झाला असेल तर माझें कांहीं ह्मणणें नाहीं. दौलतराव मला सांगत होते कीं, आजच करारपत्रावर सह्या व्हाया-च्या आहेत.

देवराव—होय, तसें खरें. बरोबर दोनप्रहरीं होणार आहेत. आपण त्या वेळीं येऊन साक्ष घालाल काय?

गंभीरराव—मी—मी नाहीं—ह्मणजे होय! मी बरोबर बारा वाजतां आपल्या येथें येईन.

देवराव—तर आतां रामराम! चला दौलतराव.

[ दौलतराव आणि देवराव जातात. ]

गंभीरराव—जो मनुष्य आपलें अंतःकरण स्त्रीवर ठेवून असतो त्याची अवस्था सरड्याप्रमाणें आहे. त्यास हवेवर निर्वाह करावा लागतो. हवेपासून त्याचा रंग बदलतो; तसेंच वाऱ्याच्या झुळकेसरसा तो फुगतो आणि बारीक होतो. कांहीं पोटीं आशा उत्पन्न झाली कीं गुलाबासारखी त्या-च्या तोंडावर लाली येते; थोडी आस्था दृष्टीस पडली कीं झाला ताजा, तशीच थोडी निराशा झाली कीं केलें हिरमुसलेलें तोंड;—तसाच वारा उत्तरेकडून दक्षणेकडे वाहूं लागला कीं चालला हा गार पडत—अहो स्त्रीयांनो, तुमचीं स्वतःचीं थोडींच पातकें असलीं पाहिजेत. कारण मनुष्यामध्यें जे सर्व अवगुण आहेत त्या सर्वांचें कारण तुह्मीच आहांत. ते सर्व अवगुण देवदूतांच्यानेंही नाहींतसे करवणार नाहींत.

[ यशवंतराव तोंड उतरलेला व कावराबावरा होऊन येतो. ]

मीं तुला सांगितलें पाहिजे असें नाहीं. तूं ऐकलेंच असशील—

**यशवंतराव**—मीं सर्व ऐकलें!

**गंभीरराव**—खेद करूं नको. तिच्यासारख्या दुसऱ्या शेंकडो रूपवती आहेत.

**यशवंतराव**—दुसऱ्या!—मला सर्व जग अंतरलें, कारण ती माझें जग होती!—माझा जीव होती. सूर्यप्रकाश पाहून तिच्या प्रफुल्लितपणाचेंच तेज पडलें आहे कीं काय असें वाटे.—भूतलावर चालणारा प्राणी पाहून तिची आठवण होई. अशी ती माझ्या अंतःकरणांत माझ्या जिवाचा जीव होऊन बसली होती. जे दिवस गेले ते सर्व तन्मय होते. तिचे शिवाय असण्याचे पुढें दिवस येतील असें माझ्या स्वप्नींही नव्हतें. आतां तें स्मरण आणि ती आशा हीं सर्व नष्ट झालीं! मोहना बेइमान झाली!—आजपासून सर्व ओस पडलें!

**गंभीरराव**—इतक्यांतच निराश होऊं नको.

**यशवंतराव**—निराश होऊं नको! होय, मला अजून एक आशा राहिली आहे.—लढायींत पडून मरण्याची. जय आणि कीर्ति हीं तर प्रीतीबरोबर निघून गेलीं; माझ्या अंतःकरणांत जेथें मोहना दृष्टीस पडावयाची तेथें मृत्यु दृष्टीस पडतो. [कांहीं वेळ थांबून]—अरे, पण मी फसलों तर नाहींना? मी हे सर्व तर्क शहरांतील गप्पा ऐकून करीत आहें. गप्पा बहुतकरून खोट्या असतात—मी फारच घाई केली! गंभीरराव, तुम्हांला कोण कोण भेटले?

**गंभीरराव**—तुझा प्रतिस्पर्धी आणि तिचा बाप—तूं खरी बातमी ऐकण्यास तयार हो—अरे हा ऐकत नाहीं—

**यशवंतराव**—तिजवर माझी प्रीति कशी होती हें तिला कधींही कळणार नाहीं. ज्या रात्रीं उत्तम स्वप्नें पडून आनंद होत असे ती सौख्याची रात्र आजपासून पुढें दुःखकारक

होणार! हे निद्रे! आतां दे मला कायमचा निरोप,– किंवा चिरकाळ राहणारी तरी हो. अरेरे! शुद्धीवर येऊन ती दुसऱ्याचे ताब्यांत आहे हें पाहणें कपाळीं येत आहे ना?

गंभीरराव–तूं मर्द आहेस, कीं आहेस तरी कोण?

यशवंतराव–मी मर्दच आहें. माझ्या सारखें दुःख जे सहन करतात ते सर्व मर्दच आहेत.

गंभीरराव–ती बेइमानी स्त्री तुह्माला योग्य नाहीं.

यशवंतराव–चुप! तिच्या विरुद्ध एक शब्द नाहीं काढूं देणार! मजसारख्या दगलबाजाचा विश्वास धरून तिनें वर्षोगणती उगीच बसावें तें काय ह्मणून? तिला बोल लावूं नका. माझ्या हल्लींच्या स्थितीपासून जो मला खेद होत आहे त्यापेक्षां ती हलकी आहे असें मानण्यापासून फारच अधिक होईल. आज–आज! ते ह्मणाले–"आज"! हा दिवस माझ्या जन्मांत सुखाचा होईल असें मानीत होतों, तो आज असा जातो ना? अरेरे! तिला नकळत जर ती एक वेळ–एकच वेळ–माझ्या दृष्टीस पडेल, आणि तिचा एकही शब्द ऐकायला सांपडेल, तर तो तेवढाच निराशेनें सर्वस्वीं ग्रासून टाकिलेल्या माझ्या या हृदयाला थोडका तरी आनंद देणारा होईल.

गंभीरराव–तें सहज होईल. तूं मजबरोबर तिच्या वरीं ये ह्मणजे झालें. हा पोशाग, या मिशा, वाटेच्या श्रमामुळें आलेला तोंडावरील तांबस रंग, हल्लींचें नांव, आणि तूं परागंदा झाला आहेस याविषयीं लोकांची खात्री, या कारणांमुळें तुझ्याविषयीं कोणासही संशय येणार नाहीं थोडासा काळोखांत बस ह्मणजे झालें. तूं मजबरोबर येच. अजूनही कांहीं आशा असेल. मोहना आहे अल्पवयी, तेव्हां त्यांनीं खोटी प्रीति दाखवून दुसरें

लग्न लावण्याविषयीं तिला जुलमानेंच कबूल करविलें असेल.

**यशवंतराव**–नको, आतां आशा धरायाला नका मला सांगूं. आशेची निराशा होणें हें पुनः माझ्यानें सोसवणार नाहीं. सूर्याचा एक किरण पडला कीं बर्फ जसें वितळतें तशी माझी गत होईल गंभीरराव, मनुष्यांमध्यें हिम्मत ह्मणून ह्मणतात तें कांहीं नाहीं; भयानें घाबरलेला गुलाम देखील मला आतां धुताडून लावील. गंभीरराव, जेव्हां प्रथम तिचा वियोग झाला तेव्हां मीं दुःख सोसलें कीं नाहीं बरें? कारण तेव्हां पुढची आशा होती. पण आतां मी—मी—
[ मोठ्यानें रडूं लागतो. ]

**गंभीरराव**–मित्रा, हें काय! आजपर्यंत ज्या स्त्रियांनीं हास्यवदनाचे योगानें मोठमोठ्या शूरांस जिंकलें, त्या सर्वांचा समुदाय देखील या तुझ्या अश्रुपातास योग्य नाहीं.

**यशवंतराव**–बरें, आटपलें सगळें–विसरा तें–मी तयार आहें. जिवाला दुःख ह्मणून आतां उरलें नाहीं! आकाश फाटून दुःखाचा वर्षावच होऊं लागला अशा प्रसंगीं ईश्वरावांचून दुसरा आधार तो कोठून येणार?

**गंभीरराव**–याची चर्या सुद्धां पालटली. अंतःकरणांत दुःख झालें कीं तेव्हांच दिसून येतें!–यशवंतराव, चल हुशारी धरून एकदां प्रयत्न कर. पुनः ती एकवार तुझ्या दृष्टीस पडेल.

**यशवंतराव**–"पुनः दृष्टीस पडेल" या शब्दांतच काय तें आहे. तेणेंकरून सर्व गर्वाचा, शक्तीचा, आणि बुद्धीचा गोंधळ होऊन वेड देखील लागतें.

**गंभीरराव**–वेळ चालली–चल लवकर, नाहीं तर उशीर होईल.

**यशवंतराव**—" उशीर होईल " हे शब्द काळजाला घरें पाडतात ! चला व्हा पुढें. एकदां अखेरीस डोळेभर पाहून घेऊन मग पुढें—

**गंभीरराव**—सोड तिचें नांव !

**यशवंतराव**—" सोड तिचें नांव " ! होय,- कारण मृत्यूला आठवणच नाहीं.

( निघून जातात. )

## प्रवेश २.

(देवरावाचे घरांतील दिवाणखाना: मोहना फार खिन्न होऊन बसली आहे.)

**मोहना**—तर मग आतां असें आहे. मी आपल्या प्राणनाथाशीं लबाडी करावी, नाहीं तर बापास मुकावें ! अहो प्राणनाथ ! काय हा प्रसंग मजवर आला आहे आज ! मी हा वेळपावेतों आपल्या ठायीं अंतःकरणपूर्वक दृढ भाव ठेविला असतां, मजपेक्षां अधिक चांगलें रत्न आपणास प्राप्त व्हावें, हें चिंतन करण्याचा प्रसंग येण्यासाठीं हा वेळपर्यंत मीं जगलें काय ? आजपर्यंत जो दृढभाव होता तो आज नाहींसा व्हावा ना ?

[ देवराव येतो ]

**देवराव**-माझे लाडके मोहने, मी आतां तुझे किती तरी उपकार मानूं ?—आणि तुझें कल्याण कसें चिंतूं ? माझी सर्व संपत्ति जाऊन अति दरिद्र आलें असतें तरी मी डगमगलों नसतों, पण अब्रूवर येऊन बेतली !—आणि ती अब्रू तूं राखलीस. व्यापाऱ्याची पत फार मौल्यवान असते. आणि ती मिळवायाला त्याला जन्मभर कष्ट करावे लागतात.

**मोहना**–याशिवाय आपणाला दुसरा कोणताही उपाय राहिला नाहीं का ?

**देवराव**–कोणताही नाहीं. तुजशीं लग्न करण्याबद्दल जी रकम दौलतरावांनीं कबूल केली आहे, ती जर आज अस्तमानपर्यंत हातीं न आली, तर उद्यां आपलें घर बुडणार. आणि माझें दिवाळें निघाल्याच्या योगानें जे शेंकडो लोक बुडाले ते सर्व या नादार व्यापाऱ्याला शिव्या आणि शाप देणार ! आणि ज्या भिकाऱ्यांस आपण जेवूं खावूं घातलें तेच लोक आपला तिरस्कार करून धिकारानें ह्मणणार–"पहा राजश्रीच्या गर्वाचा परिहार कसा झाला ! –हा पाहा तो दिवाळखोर व्यापारी बोवा !" मोहने, तूं आज मला यापासून वांचविलें !

**मोहना**–आणि मी बुडालें !

**देवराव**–मला अशी आशा आहे कीं, दौलतरावाची ही प्रीति–

**मोहना**–त्याची प्रीति ! तें नांव देखील घेऊं नका. प्रीतीला स्वहिताचा विचार नसतो. प्रीति अशा निर्दय मारवाड्याच्या द्रव्यानें अंतःकरणरहित शरीर विकत घेणारी नसते. ज्या वस्तूवर ती जडली तिचें कल्याण होण्याकरितां दुसऱ्या सर्व गोष्टींचा ती त्याग करिते. बाबा ! त्याला प्रीति ह्मणून काय आहे हें माहीत नाहीं. त्याची प्रीति ह्मणजे द्वेष, आणि आशा ह्मणजे माझा सूड उगविणें, हीं आहेत. माझे अश्रु, माझ्या वेदना, आणि लबाडीबद्दल माझा पश्चात्ताप, यांतच तो आनंद मानणार आहे.

**देवराव**–असें तूं मानीत असशील तर त्याला रुकार देऊं नको. तुला दुःखांत घालण्यापेक्षां आमचीच बेअब्रू

आणि हानी झालेली बरी;–त्याविषयीं तूं अधिक विचार करूं नको. माझें आयुष्य भरत आलें आहे, तेव्हां, मी केव्हांही मेलों तरी काय हरकत आहे? आपण झालेला करार रद्द करवूं; मग उद्यां मी म्हातारा तुरुंगांत गेलों, तरी देखील तूं बेटा सुखरूप आहेस यांतच मी सुख मानीन, आणि राजा आणि रंक ज्या समयीं सारखे होतात त्या समयाची वाट पाहत बसेन!

**मोहना**–नाहीं, बाबा, मी चुकलें. मला क्षमा करा. तुम्हीं मजवर किती ममता केली! किती माझे लाड पुरविले! मला कधींही एका कठोर शब्दानें दुखविलें नाहीं. मी कृतघ्न नव्हे. पण किती झालें तरी मी मनुष्यच आहें!–बरें तर, आतां तुम्ही त्यांना बोलवा. मी अगदीं तयार आहें. रडूं विडूं सर्व नाहींसें झालें. पण बाबा, प्रीतीचें मात्र नांव काढूं नका!

**देवराव**–बये, एकदांच कायतें कठिण वाटेल; दौलतराव हे तरुण, श्रीमान आणि कुलीन आहेत. त्यांच्याशीं संबंध केला म्हणजे तुजप्रमाणें या करवीरांत एकीलाही मान मिळणार नाहीं. खेरीज, माझ्या मागें तुला निराश्रितासारखें पडावें लागणार नाहीं.

**मोहना**–आतां मी गोष्ट पत्करली खरी; मग तींत येतील तीं संकटें पार केलीं पाहिजेत. ( एकीकडे ) हे दीनदयाळा परमेश्वरा! मज दीनाला या वेळेस धैर्य दे! आणि त्या फिरस्त्या प्राण्यावर सुखरूपी चांदण्याचा प्रकाश पाड–आतां मी जगांत असून त्यांना मुकलें!

[ आनंदीबाई, दौलतराव, ज्ञानराव, आणि उपाध्येबाबा येतात. ]

आनंदीबाई—मुली, तूं तर अगदीं दुर्मुखलेली दिसतेस—आतांच्या या आनंदकारक प्रसंगीं तूं अधिकच प्रसन्नमुखी असावेंस. आह्मी एकवार मोठीच उडी मारण्याची इच्छा करीत होतों ही गोष्ट खरी आहे! परंतु हें पाहा, दौलतरावही कुलीन घराण्यांतलेच आहेत. त्यांचे वडिलांची तर सरदारांतच गणना होती, ही कांहीं कमी आनंदाची गोष्ट नाहीं. दौलतरावांचा संबंध झाल्यानें तुला चांगलें कूळशील आणि संपत्ति हीं प्राप्त होतील. तुजप्रमाणें ज्या मुलीला चांगली शिक्षा आहे तिला लग्न होते वेळीं दोन गोष्टींचा मुख्यत्वेंकरून विचार पाहिजेः एक कूळ आणि दुसरी संपत्ति. बाकीच्या किरकोळ गोष्टींकडे लक्ष देणें हें आईबापांकडे आहे.

दौलतराव—(मोहनेजवळ जाऊन) तूं आजच्या गोष्टीला अनुमत दिलेंस ह्मणून मला फारच आनंद वाटत आहे.

मोहना—जें होणार तें चुकत नाहीं, याकरितां मीं काळाला अनुसरलें.

दौलतराव—सुंदरी, हे तुझे शब्द मोठे कठोर लागतात.

मोहना—(एकीकडे) या मनुष्याच्या अंःकरणांत दयेचा लेश तरी असेल. तो अगदीं पाषाणहृदयी झाला नसेल. [मोठ्यानें] महाराज, आतां मी तुमच्या हातीं सांपडलें आहें, तर उदार अंःतकरणानें आपला सूड उगवा ह्मणजे माझ्या बापास वांचवा आणि मला सोडा.

दौलतराव—[एकीकडे] मी आज धन्य आहें. माझा सूड उगविण्याचा हेतु सिद्धीस जाणार. माझे मनोरथ पूर्ण होणार ही केवढी आनंदाची गोष्ट! सरशेवटीं हट्टी मोहना मला शरण आली. [मोठ्यानें] तूं जें मागणें मागतेस तें देण्या-

पुरतें औदार्य माझ्यामध्यें नाहीं. तें फक्त त्या माळ्यांच्या पोरामध्येंच आहे. माझी आशा पूर्ण होण्याची संधी आली आहे ती मी आतां सोडणार नाहीं. मी करारप्रमाणें वागेन: एक तर तुजशीं लग्न लावीन, नाहीं तर तुझ्या बापाचा नाश होऊं देईन.

**मोहना**—असेंच जर असेल तर आटपलें सगळें ! महाराज, माझा निश्चय झाला.

[ बारा वाजतात. गंभीरराव आणि यशवंतराव येतात. ]

**गंभीरराव**—देवरावजी, राम राम. हे मुरारराव सुभेदार आपल्या भेटीला आले आहेत.

**आनंदीबाई**—ज्यांनीं जोधपूर सर केलें ते मुरारराव कीं काय ? खरोखर हा आज आह्मांस मोठाच लाभ आहे.

[ यशवंतराव राम राम करून मागल्या बाजूस उभा राहतो ]

**गंभीरराव**—[ मोहनेस ] चिमणे, आज तुझा आनंदाचा दिवस आहे. पण तुझी मुद्रा प्रफुल्लित दिसत नाहीं असें कां बरें ? तूं आज त्या गरीब यशवंतरावाचा संबंध तोडून टाकून या श्रीमान दौलतरावाशीं लग्न लावणार, ह्मणून तूं आज केवळ आनंदसागरांतच असावेंत !

**मोहना**—आनंदसागरांत !—

**गंभीरराव**—मुली, तुझें तोंड कशानें इतकें उतरलें !—गरीब बिचारी मुलगी ! भिऊं नको. मजवर विश्वास ठेव आणि जें काय तुला दुःख होत असेल तें मला सांग. काय, ते तुजवर जुलूम करितात ?

**मोहना**—नाहीं !—

**गंभीरराव**—तर तुझे संमतीनें हें सर्व होत आहे ?

**मोहना**—माझ्या संमतीनें होय.

गंभीरराव—तर तूं मोठी—पुढें काय ह्मणायाचें तें मी ह्मणत नाहीं.

मोहना—माझ्याविषयीं तुमचा ग्रह वाईट झालेला दिसतो. बरें असो, पण तुह्मांला सर्व ठाऊक असतें तर—

गंभीरराव—येथें कांहीं तरी गुह्य आहे.—मोहने, काय असेल तें स्पष्ट सांग.

मोहना—[ एकाएकीं ] कदाचित् तुमच्या हातून माझी सुटका होईल ! तुह्मी आमचे संबंधी आणि मित्र आहां. माझ्या बापाचें दिवाळें निघण्याची संधि आली आहे. आज त्यांना सावकारांस देण्याकरितां मोठी रकम पाहिजे आहे, आणि ती मजशीं लग्न करण्याच्या करारानें दौलतराव आज त्यांस देणार. याकरितां तुमचेपाशीं कांहीं तोड असल्यास ती काढून आह्मांला वांचवा. तुमचें कर्ज स्वर्गीं फिटेल.

गंभीरराव—[ एकीकडे ] माझे शब्द मी मागें घेतों. एकंदरींत स्त्रिया मला वाटत होत्या तितक्या वाईट नाहींत. [ मोठ्यानें ] काय करूं मुली, मला तुला मदत देण्याचें सामर्थ्य नाहीं. मी फारच गरीब आहें.

मोहना—शेवटीं मी ज्या फळीला धरून तरत होतें तीही फुटली !

गंभीरराव—थांब, हे पाहा माझे मित्र मुरारराव—यशवंतराव यांचे परम स्नेही आहेत. ते हे एक्या ठिकाणीं राहिलेले आहेत आणि लढायांत एकत्र लढले आहेत. तुला कांहीं निरोप यशवंतरावाला सांगावयाचा आहे काय ?—हें दुःख कमी वाटण्यासाठीं कांहीं शब्द ?

मोहना—हे ओळखीचे आहेत !—हे भेटणार आणि माझा शेवटचा निरोपही नेणार !—[ यशवंतरावाजवळ जातो ]

यांची चर्या निष्ठुर दिसते.–हे मजकडून तोंड फिरवितात!– महाराज, कृपाकरून एक शब्द ऐका.–

**यशवंतराव**–पुनः तिचा शब्द! पूर्वीचाच हा काळ आहे असें वाटतें!

**गंभीरराव**–[ आनंदी बाईस ] तुह्मी मध्येंच बोलूं नका. यशवंतराव किती वाईट आणि लुच्चा मनुष्य आहे हें मुराररराव तिला सांगत आहेत. त्याची व यांची फार दाट ओळख आहे हें मला ठाऊक आहे.

**आनंदीबाई**–किती विचारी आहेसरे तूं गंभीरराव !

( गंभीरराव देवरावापाशीं जातो, त्याला कांहीं खाणाखुणा करितो, देवराव त्याला एक कागद दाखवितो, तो तो कागद पाहतो आणि घेतो.)

**मोहना**–तीन वेळ मी बोलण्याचा यत्न केला. पण माझ्यानें तोंडावाटे अक्षर काढवेना! महाराज, आपण यशवंतरावांना ओळखतां? आपले ते मित्र आहेत काय?

**यशवंतराव**–होय, मी त्यांना ओळखतों आणि विपत्तिही ओळखते.

**मोहना**–तर मग आपण त्यांना भेटून घेऊन, माझें हें वियोगानें दुःखित झालेलें अंतःकरण जो शेवटला निरोप सांगेल, तो शब्दशः आपण त्यांस सांगाल ना?

**यशवंतराव**–त्यानें मजजवळ सांगितलें आहे कीं, तुमच्या मर्जीस जो अधिक योग्य पति वाटेल त्यास वरण्याचा तुह्मांस अधिकार आहे. त्यानें तुमचे संबंधाचा आपला सर्व हक्क–आपल्या नशिबाला दोष लावण्याचा देखील–सोडला आहे.–बरें, तुह्मांस काय सांगावयाचें आहे तें सांगा.

**मोहना**—त्यांना सांगा कीं, आजपर्यंत त्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार या दासीच्या मनांत आला नाहीं. आणि ते प्रवासांत सुरक्षित असावे ह्मणून रात्रंदिवस अंबाबाईचें आणि तुळशीचें मी स्तवन करीत होतें. आणखी असेंही कळवा कीं, या घटकेस मला कोणीं राज्यपद दिलें, तरी त्यावर लाथ मारून त्यांचे बरोबर दरिद्र भोगण्यास, श्रम करण्यास, भिक्षा मागण्यास, आणि त्यांच्या हास्यमुखाच्या प्रकाशावर आपली उपजीविका करण्यास मी तयार आहें.

**यशवंतराव**—(एकीकडे) काय मी इतक्यांतच वेडा झालों? मी स्वप्नांत असून, केवळ भ्रमानें इतकें सुरस व मधुर भाषण ऐकतों असें वाटत आहे काय! (मोठ्यानें) तुझी त्यावर इतकी प्रीति आहे आणि तूं त्यांस सोडतेस?

**मोहना**—त्यांला सांगा कीं, जर संकटें आणि मोह यांनीं व्याप्त झालेलें, हें माझें अंतःकरण तुह्मास कळलें तर तिनें तुह्मांस सोडलें या अपराधाची क्षमा तुमची प्रीतिच तिला करील. पहा बरें त्या ह्मताऱ्याकडे!—तो माझा पिता आहे, आणि त्याचें दिवाळें निघण्याची संधि आली आहे, आणि तो आपल्याला संकटांतून सोडविण्यास मला सांगत आहे. ज्यानें मला जन्म दिलें त्याला विसरूं काय?—त्याला हात न देतां बुडूं देऊं काय? ही सर्व हकीकत त्यांना कळवा आणि सांगा कीं, आपण पुनः स्वर्गीं भेटूं!

**यशवंतराव**—स्त्रिये—मी—मी—हें काय कोडें आहे? मदत कोणत्या प्रकारची पाहिजे आहे!

**मोहना**—(गंभीररावाकडे बोट दाखवून) जा त्यांना विचारा.

**दौलतराव**—(बसल्या ठिकाणापासून) कराराचे कागदपत्र

प्रीतीच्या हातून! काय हा सुदिन! [यशवंतरावास मिठी मारते.]

यशवंतराव—तरी प्रिये अजून तुझ्यां डोळ्यांतलें पाणी राहत नाहीं!

मोहना—पण आपण जवळ आहां, तेव्हां तें आनंदाचेंच आहे!

देवराव—तुह्मी प्रीति आणि कीर्ति फार स्तुत्य रीतीनें मिळविली. आतां उभयतां सुखानें नांदा!

आनंदीबाई—मला सगळें नवलच वाटलें आहे! तर आतां मुरारराव ते कोण?

गंभीरराव—तुह्मी ज्यांस पाहतां तेच!

यशवंतराव—या सुदीनापासून पुढें मुरारराव नांव सोडलें! माझ्या बापानें दिलेलें नांव निष्कलंक ठरे तोंपर्यंत तें मी लावणार नाहीं असा माझा निश्चय होता. आतां ती वेळ आली! सदाचरणानें वागणारावर ईश्वरानें दया केली! शिपायी पायरीपायरीनें जसा चढत गेला तशी त्याची कीर्ति अधिक झाली, आणि तुला वरण्यास अधिक योग्य केलें.

आनंदीबाई—शूर आणि सुभेदार! असो, बरेंच आहे! ते आतां पूर्वीपेक्षां फारच चांगले दिसतात. तुह्मा उभयतांचें कल्याण असो!

यशवंतराव—अरेरे! जी प्रीति दुराचारास प्रवृत्त करिते, तीच जर अंतःकरणपूर्वक असली, तर ती दुराचारापासून सोडविते; आणि ज्याच्या मनांत आपल्या पूर्वींच्या अन्यायांबद्दल प्रायश्चित्त घ्यावयाचें आहे त्यानें पुढें सदाचाराची सेवा करावी.

समाप्त.

तयार झाले, फक्त तुझी संमतीबद्दल निशाणी पाहिजे आहे.

**यशवंतराव**—स्त्रिये, थांब—आणखी एक शब्द—तुझी पितृभक्ति आणि पातिव्रत्य हीं जर एके ठिकाणीं झालीं तर त्या गरीब माळ्याच्या मुलाबरोबर तूं आपलें आयुष्य घालवशील?

**मोहना**—घालवशील ह्मणजे?—फार तर काय, पण सार्वभौम राज्याचें वैभव मिळत असलें तर तें टाकून त्यां-बरोबर मरायालाही मी तयार आहें! (मागें वळते.)

[यशवंतराव गंभीररावाजवळ जातो.]

**गंभीरराव**—ही पाहा कर्जाची याद. एकंदर बेरीज ही आहे.

**दौलतराव**—[देवरावास हुंड्या दाखवून] तिनें निशाणी क-रतांच या तुमच्या आहेत. तुमची अब्रू अद्याप गेली नाहीं.

[करारनामा मोहनेच्या हातांत देतात. तो यशवंतराव घेऊन फाडून टाकतो]

**दौलतराव**—हें काय? तुह्मी वेडे तर नाहीं.

**देवराव**—कायहो! या बेअदबीचा काय अर्थ?

**यशवंतराव**—ह्मातारेबुवा, उगेच बसा! माझा पहिला हक्क आहे. आणि तो मी ईश्वरास आणि लोकांस साक्ष ठेवून चालवितों. तुमच्या अमूल्य रत्नाला घेण्याकरितां आलेला जो हा हलकट आणि नीच जोहारी त्यापेक्षां मी तुह्मांस अधिक किंमत देतों. [हुंड्यांचें पुडकें पुढें टाकून] ही घ्या त्याच्या दुप्पट रकम आहे. ती घेण्याला शरमूं नका. या रकमेपैकीं एक कवडीही या मारवाड्याप्रमाणें दगल-बाजी किंवा हरामखोरी करून मिळविलेली नाहीं. प्रत्येक पैसा देशकल्याणाकरितां चाकरी करून निढळच्या घामानें मिळविलेला आहे.

दौलतराव–आग लागो याला !

मोहना–हे शब्द! तुह्मी–

यशवंतराव–मी तुझा पति आहें. [मोहना त्याचे गळ्यास मिठी मारते] प्रिये वर पाहा–मजकडे पाहा. मी तुझ्या नेत्र-बाणांस आतां भीत नाहीं. माझ्या नांवाला लागलेला कलंक आतां नाहींसा झाला आहे. माझी अब्रू पुनः मला मिळाली आहे. तूं क्षमा केलीस तर ही सर्व महाराष्ट्र देशांत कबूल होईल. अहाहा! काय हा आजचा सुदिन! काय हा आनंद?

दौलतराव–मी आपला बेत सिद्धीस नेत असतांच असा फसला गेलों!–मूर्ख ठरलों!–माझी फजीती उडाली! तुह्मा उभयतांचें तळपट होवो!–तुमच्या बिछान्यावर कांटे पसरोत!–आणि तुमची प्रीति विटून जाऊन मला जसा हल्लीं द्वेष टोंचीत आहे, त्याप्रमाणें तुह्मांमध्यें द्वेष उत्पन्न होवो!

गंभीरराव–तुह्मी मनास वाटतील तितके शाप द्या! मी तुह्मांस एक ह्मण सांगतों–कीं ज्याचा शाप त्यासच जाळी.

दौलतराव–त्यांचें मुख पाहून माझ्या आंगाचा तीळ-पापड होतो, पण करूं काय! आतां मी दीन दुबळा झालों आहें! [आनंदी बाईकडे वळून] तुह्मांला आनंद होवो! वाहवा! माळ्याचा मुलगा! [निघून जातो.]

गंभीरराव–[जानरावास] मला वाटतें, तुमचे स्नेही आतां फाशीं जाऊन स्वर्गाची वाट धरतील. तुह्मींही त्यांस सोबत करावी हा तुमचा धर्म आहे.

जानराव–महाराज, आपले मोठे उपकार आहेत! (जातो.)

मोहना–बाबा, तुह्मी संकटापासून मुक्त झालां-आणि माझ्या